• वर्ष : ०३ • अंक : २१५ • पुणे • रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313




# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





पाणीपुरवठ्याविना बांधकामांना परवानगी 3



जळगावात मनसेची संघटनात्मक बैठक उत्साहात 4

## ठळक बातम्या



### मानधनात वाढ करण्याचा निर्णय

पुणे (आरंभ पर्व) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कंत्राटी तत्त्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. विद्यापीठ आवारातील शैक्षणिक विभागात करार पद्धतीने नियुक्त केल्या जाणाऱ्या प्राध्यापकांना आता दरमहा ४० हजार रुपयांऐवजी ५० हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. तसेच विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रातील सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी रुबी हॉल रुग्णालयाशी करार करून विद्यार्थ्यांना विविध वैद्यकीय सुविधा आणि आपत्कालीन सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

### संजय गायकवाड यांना समज

कर्जत (आरंभ पर्व) : शिवसेनेच्या शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी कॉ. गोविंद पानसरे लिखित पुस्तकाच्या शिर्षकावरून प्रकाशकांना धमकावल्या प्रकरणावरून विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर आता शिंदे गटाचे प्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमदार गायकवाड यांना समज दिल्याचे सांगितले आहे. गायकवाड यांनी माफी मागितल्यामुळे आता हा प्रश्न संपला आहे असेही उपमुख्यमंत्री म्हणाले आहेत. 'गोदा ते नर्मदा या जलयात्रेची सुरुवात आज, शनिवारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे जन्मस्थळ असलेल्या चौंडी (ता. जामखेड) येथून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या कार्यक्रमानंतर पत्रकारांनी आमदार गायकवाड यांच्या वादग्रस्त वक्तव्याकडे उपमुख्यमंत्री शिंदे यांचे लक्ष वेधले असता त्यांनी गायकवाड यांनी माफी मागितली आहे आणि त्यांना समज दिली आहे, असे सांगत विषय संपवला व अधिक बोलणे टाळले.

### पाणीसाठा निम्म्यावर, टँकरद्वारे पाणीपुरवठा

अहिल्यानगर (आरंभ पर्व) : उन्हाळ्यातील वाढत्या तापमानाने पाणीटंचाईची झळ जिल्ह्याला बसू लागली आहे. धरणातील पाणीसाठा निम्म्यावर आला आहे तर २६ गावे व १२० वाड्यावस्त्यांमधील ४४ हजार १५२ लोकसंख्येला २० टँकरमार्फत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू करण्यात आला आहे. जिल्ह्यातील ३ मोठे व ६ मध्यम प्रकल्पातील एकूण ५१ हजार ९३ दलघफू पाणीसाठ्यापैकी २७ हजार दलघफू पाणीसाठा शिल्लक राहिलेला आहे. जिल्ह्यातील पाणीप्रकल्पामधून सिंचन, औद्योगिक वापरासह पिण्याच्या पाण्यासाठी पाणी उचलले जाते. याशिवाय वाढत्या उन्हाळ्यामुळे बाष्पीभवनाचा वेगही मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे.

# प्रतिगामी घुसखोर कोण?



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी वारकरी संप्रदायातील प्रतिगाम्यांविरोधात तुतारी फुंकली आणि सामाजिक, धार्मिक क्षेत्र ढवळून निघाले. वारकरी संप्रदाय गेल्या काही वर्षांपासून कट्टर हिंदुत्वादी हायजॅक करण्याचा प्रयत्न करत असल्याचा विचार त्यांनी मांडला. त्याचवेळी या प्रतिगाम्यांविरोधात मोठी चळवळ उभारण्याचे संकेतही दिले. धर्मांध लोकांची, प्रतिगामी लोकांची यादी तयार करून महाराष्ट्रासमोर आणण्याचे संकेतही त्यांनी दिले होते. आता राष्ट्रवादी काँग्रेसने त्या 40 प्रतिगाम्यांचा नाव आणि फोटोच जाहीर केले आहेत. याविषयीच्या बॅनरने एकच खळबळ उडाली आहे. काही दिवसांपूर्वी शरद पवार यांचा लेख प्रसिद्ध झाला होता त्या लेखात वारकरी संप्रदाय मधे प्रतिगामी लोकांनी घुसखोरी केली आहे असा उल्लेख करण्यात आला होता. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली होती. या सगळ्या टीका टिप्पणी नंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी वारकरी संप्रदाय मधे घुसखोरी करणाऱ्या लोकांची यादी प्रसिद्ध केली होती. आता या घुसखोरांचे बॅनर हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ओबीसी सेलचे अध्यक्ष राज राजापूरकर यांनी लावले आहेत. वारकरी संप्रदायामध्ये घुसखोरी च्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बिलार्ड पीअर येथील कार्यालयाच्या बाहेर बॅनरबाजी करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ओबीसी सेल चे प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर यांच्याकडून ही बॅनरबाजी करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यात एकच खळबळ उडाली आहे. राज्यात नवीन वादाला तोंड फुटणार हे निश्चित आहे. राष्ट्रवादीने प्रकाशित केलेल्या बॅनवर किशोर व्यास उर्फ गोविंद देवगिरी, गौतम खट्टर, संभाजी भिडे गुरूजी, संग्राम भंडारे, तुषार भोसले, अक्षय भोसले, प्रकाश जवंजाळ, एकनाथ सदगीर, ज्ञानेश्वर जळकीकर, आळंदी देवस्थानचे विश्वस्त योगी निरंजन, संजय पाचपोर, भास्करगिरी महाराज, संजय नाना धोंडगे, राणा वासकर, चंद्रशेखर देगलूरकर, उदबोध पैठणकर, किशोर शिवणीकर, रामगिरी महाराज, शाम राठोड, निरंजन कोटेकर यांचा समावेश आहे. याशिवाय इतर जणांचाही लवकरच चेहरा समोर आणण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

## आंघोळीचा व्हिडीओ शूट करुन महिलेवर दीड वर्ष अत्याचार

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील गिरझणी येथे अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. एका महिलेचा आंघोळ करतानाचा व्हिडीओ काढून तो व्हायरल करण्याची धमकी देत आरोपीने तब्बल दीड वर्ष तिच्यावर अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणातील आरोपी उमेश जगन्नाथ साठे हा ग्रामपंचायतीत शिपाई म्हणून कार्यरत असून अकलूज पोलिसांनी त्याला अटक केली आहे. न्यायालयाने त्याला 27 एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

दीड वर्षांपूर्वी आरोपीने संबंधित महिलेचा आंघोळ करतानाचा व्हिडीओ चोरून शूट केला. त्यानंतर हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत तिला सतत ब्लॅकमेल केले.

महिला घाबरलेल्या अवस्थेत असल्याचा फायदा घेत आरोपीने तिच्यावर सतत अत्याचार केले. या प्रकारामुळे महिला मानसिकदृष्ट्या त्रस्त झाली होती. आरोपीच्या या कृत्याला कंटाळून अखेर महिलेने संपूर्ण प्रकार आपल्या पतीला सांगितल्यानंतर दोघांनी अकलूज पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली. पोलीस निरीक्षक नीरज उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपीने आणखी कोणते गुन्हे केले आहेत का, याचा तपास पोलीस करत आहेत. या घटनेनंतर सोलापूरचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी महिलांना आवाहन केलं आहे की, अशा प्रकारचा त्रास होत असल्यास निर्भया पथकाशी संपर्क साधावा किंवा पोलिसांनी उपलब्ध करून दिलेला QR कोड स्कॅन करावा. पोलिसांकडून ओळख गुप्त ठेवून तातडीने कारवाई केली जाईल.




• ग्रामपंचायत कर्मचाऱ्याला अटक

## शक्तिपीठ अट्टाहास केवळ एका 'देवा'च्या इच्छेसाठी : जयंत पाटील


**सांगली (दै. आरंभ पर्व)**



कोणताही देव जमिनी द्या आणि माझ्या दर्शनाला या असे सांगत नाही. मात्र शक्तिपीठाचा अट्टाहास केवळ एका 'देवा'च्या इच्छेसाठी महामार्गाबाबत सामान्य माणसाच्या भावना डावलल्या जात असल्याची टीका माजी मंत्री आमदार जयंत पाटील यांनी शनिवारी केली. शक्तिपीठ महामार्गाला विरोध करण्यासाठी शक्तिपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्यावतीने आज ईश्वरपूर येथील राजारामबापू नाट्यगृहात शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात आ. पाटील बोलत होते. यावेळी ते म्हणाले, पूर्वी ८०२ किलोमीटर असलेला शक्तिपीठ महामार्ग आता ८५६ किलोमीटरपर्यंत वाढवण्यात आला आहे. लांबी वाढली, तसाच खर्चही वाढला. भराव टाकून रस्ता उभारण्याची योजना आहे. पण अशा रस्त्याची गुणवत्ता काय असेल, हे आपण पाहिलेलेच आहे. या प्रकल्पामुळे गावांची विभागणी होणार आहे. शेतीची विभागणी होणार आहे. जर शेतीची विभागणी झालीच तर आपल्याच शेतात जाण्यासाठी चार ते पाच किलोमीटरचा फेरा पडणार आहे. यामुळे शेती करणे कठीण तर होणार आहे. महामार्गामुळे बाधित होणाऱ्यांना वाढीव मोबदला मिळेल, अशी हवा तयार केली जात आहे. यापासून सावध राहणं गरजेचं आहे. आमच्या वाळवा तालुक्यात सर्व काही सुरळीत सुरू असताना, हा अनावश्यक रस्ता आमच्यावर का लादला जातोय? विविध देवस्थानांना जोडणारे मार्ग आधीपासून अस्तित्वात आहेत, मग नव्या मार्गाचा हा अट्टाहास कशासाठी? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# पुण्यात लग्नाच्या वरातीत नाचण्यावरुन वाद


## राग मनात धरुन भावानेच काढला भावाचा काटा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लग्नाच्या वरातीत नाचण्यावरुन झालेल्या भांडणाचा बदला घेण्यासाठी राग मनात धरून भावानेच आपल्या भावाला संपवल्याची धक्कादायक घटना पुण्यात घडली आहे. धारदार शस्त्राने हत्या केली आहे. भावाच्या लग्नातील वरातीत नाचण्यावरुन दोन भावांची भांडण झाली होती. याचा राग मनात धरुन भावाला संपवलं आहे. तेजस पिलाने असे हत्या करण्यात आलेल्या 24 वर्षे तरुणाचं नाव आहे. नावभारती विद्यापीठ पोलिसांनी पाठलाग करुन चार जणांना बेड्या ठोकल्या आहेत. दरम्यान, या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी विशाल खोपडे (22), अभिषेक खोपडे (23), हरिश्चंद्र धुळे (43), आदिनाथ कसबे (19) अशा चारही आरोपींना अटक केली आहे. 25 एप्रिलला कात्रज सर्व्हिस रोडवर तेजस पिलाने हा बेशुद्ध अवस्थेत आढळून आला होता. त्याच्यावर धारदार शस्त्राने वार करण्यात आल्याचं पोलिसांच्या लक्षात आलं आणि त्यानंतर पोलिसांनी भारतीय विद्यापीठ रुग्णालयात उपचारासाठी दाखल केला उपचारादरम्यान तेजसचा मृत्यू झाला. तेजसच्या भावाने पोलिसात तक्रार दाखल केली आणि याचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी थेट वेल्हा जवळील कोंढवाळे गाव गाठलं आणि त्यात तेजसची आणि आरोपी असलेल्या विशाल खोपडे याची दोघांच्याही भावाच्या लग्नात नाचण्यावरून भांडण झाल्याचं पोलिसांच्या तपासात समोर आलं. त्यानंतर पोलिसांनी तपास केला आणि 22 वर्षाच्या तरुणासह अजून तीन जणांना अटक केली आहे. विशाल खोपडे (22), अभिषेक खोपडे (23), हरिश्चंद्र धुळे (43), आदिनाथ कसबे (19) अशी चारही आरोपींची नावं आहेत. या सगळ्यांनी मिळून लग्नाच्या वरातीत नाचण्यावरून झालेल्या वादाचा राग तेजस पिलानेवर काढला आणि त्याची धारदार शस्त्राने वार करून हत्या केली.

# मनोहर भोसलेचा घोटी आश्रम बंद करा



**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

करमाळा तालुक्यातील घोटी येथे भोंदू मनोहर भोसले याच्या आश्रमाविरोधात ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. फसवणूक आणि जादूटोणा प्रकरणात भोसले अटकेत असताना त्याचा आश्रम तात्काळ बंद करावा, अशी मागणी पुढे आली आहे. घोटी गावचे सरपंच विलासकाका राऊत यांनी पोलीस अधीक्षकांना पत्र लिहून आश्रमाची सखोल चौकशी करून तो बंद करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मनोहर भोसलेच्या घोटी येथील आश्रमात दर अमावस्या आणि पौर्णिमेला मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याचं समोर आलं आहे. बाहेरील राज्यांतील लोकही येथे वास्तव्यास असल्याची माहिती देत ग्रामस्थांनी संशय व्यक्त केला आहे.

मनोहर भोसले लोकांना ज्योतिष सांगण्याच्या नावाखाली जादूटोणा करत असल्याचा आरोप आहे. यामुळे अनेकांची फसवणूक झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. सध्या या प्रकरणी त्याच्यावर गुन्हे दाखल असून न्यायालयाने त्याला मंगळवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. घोटी गावातील कोणताही ग्रामस्थ मनोहर भोसले यांच्याकडे जात नसून त्यांच्या संपर्कातही नाही असं सांगण्यात आलेलं आहे. त्यामुळे आता मनोहर भोसलेचा घोटी येथे 27 एकरावर असणारा आलिशान आश्रम बंद करण्यासाठी ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. 2021 मध्ये करमाळा-इंदापूर सीमेवरील मांजरगाव येथे असलेला भोसलेचा आश्रम गुन्हा दाखल झाल्यानंतर बंद करण्यात आला होता. त्यावेळीही स्थानिकांनी आक्रमक भूमिका घेतली होती. आता घोटी येथील 27 एकरावर पसरलेल्या आलिशान आश्रमाबाबत पोलीस काय कारवाई करणार, याकडे संपूर्ण करमाळा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### कोण आहे मनोहर मामा भोसले?

- इंदापूर तालुक्यातील लासुर्णे गावातला मूळचा रहिवासी.
- डीएडच्या परीक्षेत नापास झाल्यानंतर आठवडा बाजारात सुके बोंबील विकून उदरनिर्वाह करत होता.
- एक दिवस तो अचानक गायब झाला आणि काही वर्षानंतर आपल्याला संत बाळूमामा प्रसन्न असून त्यांचा आशीर्वाद असल्याचा दावा केला.
- करमाळा तालुक्यातील उंदरगाव परिसरात त्याने स्वतःचा मठ थाटला होता.
- साक्षात बाळूमामा येत असल्याचे ऐकल्यानंतर अमावस्या पौर्णिमेला त्याच्याकडे भक्ताची मोठी गर्दी होऊ लागली.
- अनेक मोठ्या नेत्यासोबत देखील मनोहर मामा याचे फोटो आहेत.
- अनेक राजकीय नेते आणि कार्यकर्ते या मामाच्या सल्ल्यासाठी गर्दी करायचे अशी चर्चा आहे.
- या आधी त्याच्यावर महिलेवर अत्याचार केल्याप्रकरणात सोलापुरातील करमाळा पोलिसात गुन्हा दाखल आहे.
- कर्करोग बरा करतो म्हणून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी बारामतीत तर मणक्याचे आजार बरे करतो म्हणून फसवणूक केल्याप्रकरणी दौंड पोलिसांत गुन्हा नोंद आहे.
- 2021 मध्ये 3 गुन्हे दाखल झाल्यानंतर देखील त्याने आपली भोंदूगिरी सुरूच ठेवली होती.



थोडक्यात पण महत्वाचे



## नऱ्हे परिसरातील पावसाळ्यापूर्वी ओढे नाले सफाई करा : कोमल नवले

पुणे (आरंभ पर्व) : प्रभाग क्रमांक ३४ मधील नऱ्हे गावात पावसाळ्याच्या तोंडावर गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, ओढे, नाले आणि कलवर्ट परिसरातील अतिक्रमणांमुळे पूरस्थितीचा धोका वाढला आहे. नाल्यांमध्ये साचलेला गाळ, कचरा तसेच अनधिकृत बांधकामांमुळे पावसाचे पाणी सुरळीत वाहून जाण्यास अडथळे निर्माण होत आहेत. दरवर्षी पावसाळ्यात नऱ्हे परिसरात पाणी साचण्याच्या घटना घडत असल्या तरी यंदा परिस्थिती अधिक बिकट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः नाल्यांच्या कडेला झालेली अतिक्रमणे आणि साफसफाईचा अभाव यामुळे मुसळधार पावसाच्या वेळी पाणी थेट घरांमध्ये व रस्त्यांवर शिरण्याची भीती नागरिकांमध्ये आहे. या पार्श्वभूमीवर पावसाळ्यापूर्वी तातडीने नाले व ओढ्यांची सफाई करण्याची ठाम मागणी नगरसेविका सौ. कोमल सारंग नवले यांनी केली आहे. याबाबत त्यांनी महानगरपालिकेकडे निवेदन सादर केले आहे. माजी नगरसेवक बाळासाहेब नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांना प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने नाले सफाई व अतिक्रमणांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि संभाव्य पूरस्थिती टाळण्यासाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना करणे अत्यावश्यक असल्याचे मत नऱ्हेकरांकडून व्यक्त होत असून, आता प्रशासनाच्या कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. याबाबत मनपा आयुक्त नवल किशोर राम यांनी पाहणी करण्याचे आदेश संबंधित विभागांना दिले आहेत.



## सचिन मोरे यांच्या सिंहगड रोड प्रभाग समिती अध्यक्षपदी निवडीचे स्वागत

पुणे (आरंभ पर्व) : सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग समितीच्या नूतन अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नगरसेवक सचिन मोरे यांचा उत्साहात सत्कार करण्यात आला. पुणे शहर भाजप ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्ष रमेश गायकवाड तसेच जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते हे उपस्थित होते. त्यांनी सचिन मोरे यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत, त्यांच्या नेतृत्वाखाली सिंहगड रोड परिसराचा सर्वांगीण विकास होईल, असा विश्वास व्यक्त केला. आपल्या सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना सचिन मोरे म्हणाले की, “ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानासोबतच एक मोठी जबाबदारी आहे. नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आणि परिसराच्या विकासासाठी मी कटिबद्ध राहीन.” त्यांनी पुढे सांगितले की, प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वय साधत विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न राहील. यावेळी स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बाकलीवाल ट्युटोरियल्सचा जेईई मेन मध्ये पुन्हा दमदार ठसा



पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील नामांकित कोचिंग संस्था बाकलीवाल ट्युटोरियल्स (BT) ने जेईई मेन (JEE Main) च्या निकालात पुन्हा एकदा उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक क्षेत्रात आपली भक्कम छाप कायम राखली. 20 एप्रिल रोजी सायंकाळी जाहीर झालेल्या निकालात, बीटी चा विद्यार्थी सिद्धार्थ आठल्ये याने 100 पर्सेंटाइल मिळवत पुणे शहरात प्रथम क्रमांक पटकावला. त्याला ऑल इंडिया रँक 25 प्राप्त झाला असून, या यशामुळे संस्थेचा आणि शहराचा गौरव वाढला आहे. सिद्धार्थ आठल्ये हा इयत्ता आठवीपासून बीटी मध्ये शिक्षण घेत असून, त्याच्या सातत्यपूर्ण मेहनतीला आणि मार्गदर्शनाला हे यश मिळाले आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षी जेईई मेन 2025 मध्येही बीटीच्या आयुष चौधरी याने 100 पर्सेंटाइल मिळवत महाराष्ट्रात अव्वल स्थान मिळवले होते. त्यामुळे सलग दुसऱ्या वर्षी बीटी ने हा मानाचा तुरा पटकावला आहे. यंदाच्या निकालात बीटीच्या 15 विद्यार्थ्यांनी ऑल इंडिया टॉप 1000 मध्ये स्थान मिळवले असून, 33 विद्यार्थी टॉप 2000 मध्ये आणि 85 विद्यार्थी टॉप 5000 मध्ये झळकले आहेत. तसेच अनेक विद्यार्थी 17 मे 2026 रोजी होणाऱ्या जेईई ॲडव्हान्स 2026 साठी पात्र ठरले आहेत. या यशाबद्दल बोलताना संस्थेचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर वैभव बाकलीवाल यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की, “विद्यार्थ्यांची कठोर मेहनत, समर्पण आणि आमच्या शिस्तबद्ध व लक्ष केंद्रीत शिक्षण पद्धतीचे हे फलित आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेचा सर्वोत्तम विकास करणे हेच आमचे ध्येय आहे. जेईई ॲडव्हान्ससाठी पात्र ठरलेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.” सखोल संकल्पनात्मक शिक्षण, अनुभवी शिक्षक, नियमित चाचण्या आणि वैयक्तिक मार्गदर्शन या घटकांच्या बळावर BT ने अनेक वर्षांपासून जेईई मेन आणि जेईई ॲडव्हान्स परीक्षांमध्ये उत्कृष्ट निकालांची परंपरा कायम ठेवली आहे. संस्थेने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## टीके एलिव्हेटरकडून भारतात फॅक्टरी विस्तार प्रकल्पाचा शुभारंभ

पुणे (आरंभ पर्व) : टीके एलिव्हेटर (टीकेई) या शहरी गतिशीलता आणि व्हर्टिकल ट्रान्सपोर्टेशन क्षेत्रातील जागतिक अग्रणी कंपनीने भारतातील आपल्या फॅक्टरी विस्तार प्रकल्पाचा भूमीपूजन समारंभाद्वारे शुभारंभ केला आहे. उत्पादन क्षमता वाढवणे आणि लॉजिस्टिक्स व्यवस्था अधिक सक्षम करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. कंपनीच्या विद्यमान सुविधेमध्ये सुमारे १०,००० चौरस मीटरची भर घालण्यात येणार असून, या विस्तारामुळे उत्पादन कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढणार आहे. तसेच वेअरहाऊसिंग आणि लॉजिस्टिक्स क्षमताही अधिक सक्षम होणार आहेत. या प्रकल्पाचे बांधकाम सुरू झाले असून, ऑगस्ट २०२७ पर्यंत तो पूर्णपणे कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

# ‘हिमालया बेबीकेअर’तर्फे ‘हेल्दी बेबी कॉन्टेस्ट’चे आयोजन

### पुण्यातील या समाजाभिमुख उपक्रमातून पालक आणि आरोग्य तज्ज्ञ एकत्र; बाळांच्या सर्वांगीण संगोपनाबाबत जनजागृती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हिमालया बेबीकेअर या आघाडीच्या व लोकप्रिय बेबीकेअर ब्रँडने स्माईल फाउंडेशन यांच्या सहकार्याने पुण्यात ‘हेल्दी बेबी कॉन्टेस्ट’चे आयोजन केले. या उपक्रमात माता, त्यांची बाळे, समुदाय आरोग्य कर्मचारी आणि बालसंगोपन तज्ज्ञ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बालकांचा सर्वांगीण विकास, मातांचे आरोग्य आणि बालसंगोपनाविषयी जनजागृती करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.



या स्पर्धेत १३० हून अधिक मातांनी आपल्या बाळांसह उत्साहाने सहभाग नोंदवला. कार्यक्रमादरम्यान बाळांच्या हालचालींची कौशल्ये, उंची, वजन आणि सक्रियता यांसारख्या महत्त्वाच्या विकास घटकांचे तज्ज्ञांकडून मूल्यमापन करण्यात आले. आरोग्य तज्ज्ञ आणि स्माईल फाउंडेशनच्या प्रोग्रॅम टीमनेही या उपक्रमाला सक्रिय पाठिंबा दिला. संपूर्ण वातावरण उत्साही आणि समाजाभिमुख होते. स्पर्धेतील विजेत्यांमध्ये अंकित बराणे आणि कियारा गणेश बडगुजर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. वैष्णव एरंडे आणि शिव आकाश राठोड यांनी द्वितीय, तर स्वरा पाटील आणि संघमित्रा जगदीश खोब्रागडे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. विजेत्यांना प्रमाणपत्र आणि हिमालया बेबी गिफ्ट पॅक देऊन गौरविण्यात आले. तसेच सर्व सहभागी मातांना सहभाग प्रमाणपत्र, माइलस्टोन बुकलेट आणि सॅम्पल पॅक असलेली गूडी बॅग देण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान मातांना स्तनपान, बाळांचे पोषण, स्वच्छता, लसीकरणाचे वेळापत्रक आणि शिशूसंगोपनाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे माहितीपूर्ण आणि निरोगी पद्धतीने बाळांची काळजी घेण्याचे महत्त्व अधोरेखित झाले.

यावेळी चक्रवर्ती एन. व्ही. (संचालक, बेबीकेअर विभाग, हिमालया वेलनेस कंपनी) म्हणाले, “बाळाच्या वाढीसाठी सुरुवातीची वर्षे अत्यंत महत्त्वाची असतात. ‘हेल्दी बेबी कॉन्टेस्ट’च्या माध्यमातून पालकांना वैद्यकीय मार्गदर्शन आणि आवश्यक साधने उपलब्ध करून देण्याचा आमचा उद्देश आहे. स्थानिक संस्थांसोबत भागीदारी करून आम्ही तळागाळातील कुटुंबांपर्यंत पोहोचत आहोत.”

तसेच सरिता प्रधान (प्रमुख, ‘स्वाभिमान’ व ‘एम्पॉवरिंग ग्रासरूट्स’ उपक्रम, स्माईल फाउंडेशन) म्हणाल्या, “लहान वयातील योग्य पोषण आणि काळजी यामुळे बालक आणि माता दोघांच्याही आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो. या उपक्रमातून आम्ही १३० हून अधिक मातांशी थेट संवाद साधत निरोगी सवयींचे महत्त्व पटवून दिले.” या उपक्रमामुळे मातांना तज्ज्ञांशी संवाद साधण्याची, बाळांच्या संगोपनाविषयी आवश्यक माहिती मिळवण्याची आणि निरोगी पालकत्वाचा अनुभव साजरा करण्याची संधी मिळाली. अशा उपक्रमांद्वारे निरोगी व आनंदी बालसंगोपनासाठी आपली कटिबद्धता हिमालया बेबीकेअर ब्रँडने पुन्हा अधोरेखित केली.

## वडगाव बुद्रुकमधील आठवडा बाजार अखेर बंद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वडगाव बुद्रुक परिसरात दर बुधवारी भरविण्यात येणारा शेतकरी आठवडा बाजार अखेर बंद करण्यात आला आहे. या निर्णयामुळे स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, दीर्घकाळापासून सुरू असलेल्या वाहतूक कोंडीच्या समस्येवर काही प्रमाणात उपाय झाला आहे. नगरसेवक सचिन मोरे यांनी सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत हा मुद्दा ठामपणे मांडला होता. आठवडा बाजारामुळे परिसरातील मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी होत होती, परिणामी वाहतूक ठप्प होत होती आणि नागरिकांना रोजच्या प्रवासात मोठा त्रास सहन करावा लागत होता. विशेषतः शाळा, कार्यालये आणि रुग्णालयांकडे जाणाऱ्या नागरिकांना याचा फटका बसत होता. या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका प्रशासनाने परिस्थितीचा आढावा घेत अखेर हा बाजार बंद करण्याचा निर्णय घेतला. प्रशासनाच्या या कारवाईमुळे वाहतुकीची कोंडी कमी होण्यास मदत होणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, दुसरीकडे या निर्णयामुळे शेतकरी



- नागरिकांना दिलासा, विक्रेत्यांची पुनर्वसनाची मागणी
- नगरसेवक सचिन मोरे यांनी केली होती मागणी

व लहान विक्रेत्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. या बाजारावरच आपला उदरनिर्वाह अवलंबून असलेल्या विक्रेत्यांनी पर्यायी ठिकाणी बाजार भरविण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे. “आम्हाला व्यवसायासाठी दुसरे ठिकाण उपलब्ध करून द्यावे, अन्यथा आमच्यावर उपासमारीची वेळ येईल,” अशी भावना काही विक्रेत्यांनी व्यक्त केली. दरम्यान, नागरिकांच्या सोयीसाठी घेतलेला हा निर्णय योग्य असला, तरी विक्रेत्यांचेही पुनर्वसन करणे तितकेच आवश्यक असल्याची चर्चा परिसरात रंगत आहे.

# मराठमोळा श्रीमान लेजंडचा नवा अध्याय

**(दै. आरंभ पर्व)**

भारतीय गेमिंग आणि मनोरंजन क्षेत्रात सध्या मोठा बदल घडताना दिसत आहे. मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लोकप्रिय कंटेंट क्रिएटर श्रीमान लेजंड आता अधिकृतपणे ई-स्पोर्ट्सच्या मैदानात उतरला आहे. विशेष म्हणजे, त्याने आपल्या प्रवासात कधीही कोणाची मदत न घेता स्वतःच्या कष्टावर हे यश मिळवलं आहे. इंडस्ट्रीमधील अनेक ई-स्पोर्ट्स ऑर्गनायझेशनमधील खेळाडू आणि क्रिएटर्स त्याचे जवळचे मित्र असले तरी, त्याने नेहमी स्वतःचा वेगळा मार्ग निवडला. आज त्या सर्वांच्या पाठिंब्याने तो नव्या टप्प्यावर पोहोचला आहे.

महाराष्ट्रातून आपल्या प्रवासाची सुरुवात करताना श्रीमान लेजंडने मराठी भाषेतून स्ट्रीमिंग करत एक वेगळी ओळख निर्माण केली. त्याची साधी, विनोदी आणि प्रेक्षकांशी थेट जोडणारी शैली यामुळे तो अल्पावधीतच लाखो तरुणांच्या मनात घर करून गेला. त्याचे लाईव्ह स्ट्रीम्स आणि व्हिडिओज हजारो-लाखो प्रेक्षक नियमितपणे पाहतात. “तो फक्त गेम खेळत नाही, तर प्रेक्षकांना



### भारतीय ई-स्पोर्ट्समध्ये दमदार एन्ट्री

खऱ्या अर्थाने एंटरटेन करतो,” अशी भावना त्याच्या चाहत्यांकडून व्यक्त होताना दिसते. आता त्याने ‘Apex Gaming’ या नव्या ई-स्पोर्ट्स ऑर्गनायझेशनमध्ये संस्थापक सदस्य म्हणून प्रवेश करत एक मोठे पाऊल उचलले आहे. ही संस्था ई-स्पोर्ट्स, एंटरटेनमेंट आणि लाइफस्टाइल यांचा संगम साधण्याच्या उद्देशाने उभी राहिली आहे. प्रसिद्ध गेमर जोनाथन गेमिंगसोबत श्रीमान लेजंडची ही जोडी सध्या चर्चेचा विषय ठरली आहे.

श्रीमान लेजंडच्या या निर्णयामुळे मराठी भाषेला गेमिंग क्षेत्रात एक नवीन दिशा मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. आजपर्यंत इंग्रजी आणि हिंदी भाषेचं वर्चस्व असलेल्या या क्षेत्रात आता मराठी मुलं-मुली मोठ्या प्रमाणावर सहभागी होताना दिसतील. गेमिंगमध्ये करिअर करण्याचं स्वप्न पाहणाऱ्या अनेक तरुणांसाठी हा एक प्रेरणादायी टप्पा ठरत आहे. श्रीमान लेजंड स्वतः या क्षेत्रात उतरल्यामुळे मराठी युवांसाठी संधीची नवी दारे उघडली आहेत.

आज अनेक विद्यापीठांमध्ये गेमिंग आणि ई-स्पोर्ट्सशी संबंधित अभ्यासक्रम सुरू झाले आहेत, ज्यामुळे या क्षेत्राला अधिक व्यावसायिक स्वरूप प्राप्त होत आहे. अशा पार्श्वभूमीवर श्रीमान लेजंडसारख्या लोकप्रिय व्यक्तीचा सहभाग हा इंडस्ट्रीसाठी महत्त्वाचा टर्निंग पॉइंट ठरू शकतो. एकूणच, श्रीमान लेजंडचा हा नवा प्रवास केवळ त्याच्या कारकिर्दीचा विस्तार नसून, मराठी तरुणांच्या स्वप्नांना दिशा देणारा आणि भारतीय ई-स्पोर्ट्स क्षेत्राला नवी उंची देणारा ठरत आहे. ‘Apex Gaming’ ही केवळ सुरुवात असून, पुढील काळात हा प्रवास अधिक मोठा आणि प्रभावी होणार, यात शंका नाही.

**शब्दांकन - प्रितेश माने**

# पुनरिक्षण आढावा बैठकीत बीएलओचा सत्कार

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

१९५ - जुन्नर विधानसभा मतदार संघात आगामी 'मतदार यादी सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६' च्या आढावा बैठकीत (मंगळवारी दि.२१ रोजी) उत्कृष्ट कार्य करणाऱ्या बीएलओंचा सत्कार करण्यात आला. याचबरोबर कामकाजाचा आढावा घेण्यात आला असल्याची माहिती मतदान नोंदणी अधिकारी पल्लवी घाडगे यांनी दिली.



या बैठकीला तहसीलदार बाळासाहेब शिरसट, गट विकास अधिकारी प्रतीक चेन्नवार, तालुका कृषी अधिकारी गणेश भोसले, निवडणूक नायब तहसीलदार ए. बी. गवारी आणि गट शिक्षण अधिकारी अशोक लांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. निवडणूक नायब तहसीलदार ए. बी. गवारी यांनी उपस्थितांचे स्वागत करून मतदार यादी संदर्भात सध्या सुरू असलेल्या कामाचा सविस्तर आढावा सादर केला. यावेळी मतदार नोंदणीच्या कामात उल्लेखनीय आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पर्यवेक्षकांचा तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचा (BLO) यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.सत्कारार्थी कर्मचारी पुढील प्रमाणे :- ललित गाढवे(पर्यवेक्षक) प्रदीप नामदेव कुटे,सूर्यकांत जनाजी साळवे, विजय लक्ष्मण कुटे,चंद्रशेखर मुरलीधर नलावडे,कैलास बाबुराव शिंदे,रमेश रामदास बेल्हेकर,नाना पांडुरंग ठाकरे ,शिवाजी रामकांत जाधव,दिनेश पंडित कुलवडे, प्रशांत बबन जोरवर,काळूराम संभाजी नाईकरे, संतोष महादेव गाडगे,मोहन सखाराम उंडे,दायमी सैयद मजीद सैय्यद,रमेश दामु कुटे,चंद्रकांत दादाभाऊ घाडगे(केंद्र स्तरीय मतदान अधिकारी) चागलं कामकाज केले त्यांचे कौतुक केले ज्यांचे काम कमी आहे त्यानीं वेळेत पूर्ण करा अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल असे मतदान नोंदणी अधिकारी पल्लवी घाडगे यांनी सांगितले


मतदार यादीचे शुद्धीकरण मोहिमेत यादीतील त्रुटी दूर करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने ब्लर फोटो बदलणे, दुबार नावे वगळणे आणि मयत मतदारांची नावे कमी करणे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

तहसीलदार बाळासाहेब शिरसट यांनी मतदार यादी पारदर्शक आणि निर्दोष असणे ही लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाची पायरी असल्याने सर्व कर्मचाऱ्यांनी कामकाज वेळेत आणि अचूकपणे पूर्ण करावे असे सांगितले.

## मराठी ZEE5 वर ‘डिटेक्टिव्ह धनंजय – रहस्यजाल’चा थरार

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

ZEE5 च्या मराठी विभागाकडून प्रेक्षकांसाठी आणखी एक थरारक गूढकथा सादर केली जाणार आहे. ‘डिटेक्टिव्ह धनंजय – रहस्यजाल’ या मराठी ओरिजिनल मालिकेची घोषणा करण्यात आली असून, या मालिकेचा प्रीमियर १ मे २०२६ रोजी होणार आहे. आदिनाथ कोठारे आणि पुष्कराज चिरपुटकर यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेचे दिग्दर्शन श्रीरंग गोडबोले यांनी केले आहे, तर लेखन गिरीश जयंत जोशी यांचे आहे. प्रसिद्ध लेखक बाबुराव अर्नाळकर यांच्या गाजलेल्या साहित्यावर आधारित ही कथा असून इंडियन




मॅजिक आय आणि स्टोरीटेलर्स नूक यांनी निर्मिती केली आहे. ‘डिटेक्टिव्ह धनंजय – रहस्यजाल’ची कथा शिरगाव या काल्पनिक पण रहस्यमय शहरात घडते. एका गुंतागुंतीच्या खूनप्रकरणाच्या तपासात अडकलेल्या एका बुद्धिमान खासगी गुप्तहेराचा प्रवास यात उलगडतो. चुकीच्या पद्धतीने आरोपी ठरलेल्या व्यक्तीची निर्दोषता सिद्ध करण्यासाठी तो काळाशी स्पर्धा करत असताना अनेक गूढ, फसवणूक आणि छुपे हेतू समोर येतात. ही मालिका केवळ ‘गुन्हा कोणी केला’ यावर न थांबता ‘तो का घडला’ याचा सखोल शोध घेते. त्यामुळे कथानकात मानवी भावना, मानसशास्त्र आणि नैतिकतेचे विविध पैलू प्रभावीपणे मांडले गेले आहेत.

## टॉपर विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जेईई मेन २०२६ सेशन २ परीक्षेचा निकाल जाहीर होताच फिजिक्सवाला (पीडब्ल्यू)च्या देशभरातील केंद्रांवर उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. टॉपर विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या उल्लेखनीय यशानंतर मंगळवारी विविध ठिकाणी जल्लोष साजरा करण्यात आला.

या परीक्षेत मुंबईतील भाईंदरचा विद्यार्थी साहिल प्रधान याने १४ वा ऑल इंडिया रँक (एआयआर) मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. त्याचबरोबर गुरुशिष सिंग चड्ढा (एआयआर ११२) हा उत्तराखंड राज्यातील टॉपर ठरला, तर हरियाणातील नमन वर्मा (एआयआर २४३) यानेही विशेष कामगिरी करून लक्ष वेधले. शेतकरी कुटुंबातील नमनने अवघ्या काही महिन्यांत ऑनलाइन ड्रॉपर बॅचमधून तयारी करत हे यश संपादन केले. राज्यनिहाय टॉपरमध्ये हेमाक्षी कुमार (अंदमान व निकोबार), विष्णू भारद्वाज उपाध्याय (मेघालय) आणि रोहित शर्मा (हिमाचल प्रदेश) यांचा समावेश आहे. मुंबईतील पीडब्ल्यू केंद्रातील विद्यार्थ्यांमध्ये सत्यम जगताप (९९.९६ टक्के – एआयआर ६६७), सौम्या सोनी (९९.८२ टक्के – एआयआर २८९१) आणि कौशल ढगाळे (९९.७५ टक्के – एआयआर ४०७७) यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. तसेच पुण्यातील विद्यार्थ्यांमध्ये सार्थक पलाई (९९.८४ टक्के – एआयआर २५९८), आर्यन नाईक (९९.७७ टक्के – एआयआर ३७०७) आणि जिशान रंबोली (९९.७६ टक्के – एआयआर ३८०६) यांनीही टॉपर्समध्ये स्थान मिळवले.

फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी अलख पांडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले, “जेईई मेन २०२६ देणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा आम्हाला अभिमान आहे. उत्कृष्ट गुण मिळवणाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

# नागेश चव्हाण यांचे आंदोलन स्थगित

### कारवाईसाठी महिन्याची मुदत : कारवाई न झाल्यास ठिय्या आंदोलन करण्याचा चव्हाण यांचा इशारा

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील अंबाबाईची वाडी, जोतिबाची वाडी आणि हत्तीज परिसरात सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीविरोधात उभारण्यात आलेले आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस सोलापूरचे सरचिटणीस नागेश चव्हाण यांनी ही माहिती दिली असून, प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या भागात गेल्या काही वर्षांपासून अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून होत होती. या पार्श्वभूमीवर नागेश चव्हाण यांनी जनआंदोलन उभारले होते. तसेच प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर २१



एप्रिल रोजी आत्मदहन आंदोलन करण्याचा इशाराही दिला होता.

दरम्यान, सोलापूर ग्रामीणचे जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी नागेश चव्हाण यांच्याशी चर्चा केली. या चर्चेदरम्यान त्यांनी संबंधित भागातील अवैध दारू विक्रीविरोधात एक महिन्याच्या आत ठोस कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. प्रशासनाच्या या भूमिकेनंतर नागेश चव्हाण यांनी आत्मदहन आंदोलन मागे घेतल्याची घोषणा केली. नागेश चव्हाण यांनी सांगितले की, प्रशासनाला दिलेल्या मुदतीत अपेक्षित कारवाई झाली नाही, तर यापेक्षा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल. गरज पडल्यास वैराग पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, या प्रकरणामुळे परिसरातील नागरिकांमध्ये अपेक्षा निर्माण झाली असून, प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अवैध दारू विक्रीमुळे समाजावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता, या विरोधातील कारवाई अत्यंत गरजेची असल्याचेही नागरिकांकडून सांगितले जात आहे.




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
रविवार, दि. २६ एप्रिल २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



### ASUS कडून ExpertBook Ultra लाँच

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीची कंपनी ASUS ने भारतीय बाजारपेठेत आपला नवीन फ्लॅगशिप बिझनेस लॅपटॉप 'ExpertBook Ultra' सादर केला आहे. एआय-शक्तीवर चालणारा हा Copilot+ पीसी व्यावसायिक, CXO आणि उद्योग नेत्यांसाठी विशेषतः डिझाइन करण्यात आला असून, यासोबतच कंपनीने 'ExpertBook P' सिरीजचाही विस्तार जाहीर केला आहे. 'चिंतामुक्त व्यवसाय' या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवत ASUS ने कार्यक्षमता, सुरक्षा आणि टिकाऊपणाचा संगम साधण्याचा प्रयत्न केला आहे. 'ExpertBook Ultra' हा अत्यंत हलका आणि प्रीमियम लॅपटॉप असून त्याचे वजन अवघे ०.९९ किलोपासून सुरू होते. AZ31B मॅग्नेशियम-ॲल्युमिनियम मिश्रधातूपासून बनवलेल्या या डिव्हाइसला एरोस्पेस आणि फॉर्म्युला-१ दर्जाची मजबुती देण्यात आली आहे. 9H हार्डनेस असलेल्या नॅनो-सिरेमिक कोटिंगमुळे त्याची टिकाऊपणा अधिक वाढवण्यात आली आहे. यामध्ये Intel चा नवीनतम Core Ultra Series 3 प्रोसेसर, प्रगत GPU आणि NPU यांचा समावेश असलेला हेटेरोजिनियस एआय कम्प्युटिंग प्लॅटफॉर्म देण्यात आला आहे.

### नेस्ले इंडियाची दमदार कामगिरी; दशकातील सर्वाधिक त्रैमासिक वाढ



नवी दिल्ली (आरंभ पर्व) : ग्राहक-केंद्रित धोरण आणि ब्रँडमध्ये वाढीव गुंतवणुकीच्या जोरावर नेस्ले इंडियाने चालू आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीत गेल्या जवळपास दशकातील सर्वाधिक वाढ नोंदवली आहे. दुहेरी अंकी विक्री-परिमाण (Volume) वाढीमुळे कंपनीची एकूण कामगिरी अधिक मजबूत झाली असून, देशांतर्गत विक्रीने ₹६,४४५ कोटींचा विक्रम गाठला आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचे आर्थिक निकाल मंजूर केले. चौथ्या तिमाहीत एकूण विक्रीत २३.४% तर देशांतर्गत विक्रीत २३.१% वाढ नोंदवली गेली. EBITDA मार्जिन २६.३% इतके सुदृढ राहिले. कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मनीष तिवारी यांनी सांगितले की, "जाहिरातींवरील खर्चात ५०% पेक्षा अधिक वाढ करूनही आम्ही मजबूत नफाक्षमता राखली आहे. ग्राहकांपर्यंत अधिक प्रभावी पोहोच, उत्पादनांचे प्रीमियमीकरण आणि संसाधनांचे शिस्तबद्ध व्यवस्थापन यामुळे ही वाढ साध्य झाली." कंपनीचा प्रमुख ब्रँड 'मॅगी'ने बाजारातील आपले अग्रस्थान कायम ठेवले असून 'किट-कॅट' आणि 'नेस्कॅफे' या ब्रँड्सनीही वेगाने बाजारपेठेतील हिस्सा वाढवला आहे. सर्व उत्पादन गटांनी या वाढीत सकारात्मक योगदान दिले.

### बिटडेल्टा इंडियाने 'इन्स्टिट्यूशनल-ग्रेड' क्रिप्टो ट्रेडिंग सुविधा सुरू केली



नवी दिल्ली (आरंभ पर्व) : सुरक्षेला सर्वाधिक प्राधान्य देणाऱ्या आणि ग्राहकांच्या सोयीचा विचार करणाऱ्या 'बिटडेल्टा इंडिया' या क्रिप्टो ट्रेडिंग प्लॅटफॉर्मने आज भारतात अधिकृतपणे सुरुवात केली आहे. ही कंपनी भारत सरकारच्या 'फायनान्शिअल इंटेलिजन्स युनिट' (FIU-IND) कडे नोंदणीकृत असून, भारतीय गुंतवणूकदारांना सुरक्षित, शिस्तबद्ध आणि विश्वासार्ह व्यवहार करता यावेत या मुख्य उद्देशाने ती या मार्केटमध्ये उतरली आहे. थोडक्यात सांगायचे तर, आता भारतीयांना जागतिक दर्जाची सुरक्षा आणि सरकारी नियमांचे पालन करणाऱ्या एका विश्वासार्ह प्लॅटफॉर्मवर डिजिटल मालमत्तेचे व्यवहार करता येतील. भारत हे जगातल्या अशा देशांपैकी एक आहे जिथे 'क्रिप्टो' किंवा डिजिटल चलनाचे मार्केट खूप वेगाने वाढत आहे. सध्या भारतात जवळपास ११.९ कोटी लोकांनी यामध्ये नोंदणी केली असून, आता फक्त मोठ्या शहरांमधीलच नाही तर लहान शहरांतील (Tier-2 आणि Tier-3 शहर) लोकही यात मोठ्या उत्साहाने भाग घेत आहेत. जसजसे हे मार्केट वाढत आहे, तसतसा लोकांचा दृष्टिकोनही बदलत आहे. आता लोकांना फक्त 'क्रिप्टो विकत घेता येणे' एवढेच महत्त्वाचे वाटत नाही, तर ज्या कंपनीकडून आपण हे व्यवहार करत आहोत ती किती सुरक्षित आहे, विश्वास ठेवण्यासारखी आहे का? आणि तिचे नियम किती कडक आहेत, याला लोक जास्त महत्त्व देऊ लागले आहेत. थोडक्यात, आता लोक केवळ गुंतवणुकीसाठी नाही तर 'सुरक्षित गुंतवणुकीसाठी' चांगल्या प्लॅटफॉर्मच्या शोधात आहेत.

### मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणेचा जनजागृतीवर भर

पुणे (आरंभ पर्व) : Medicover Hospitals, पुणे यांनी जागतिक मलेरिया दिनानिमित्त मलेरियाबाबत जनजागृती वाढवण्याचा ठाम संकल्प व्यक्त केला आहे. मलेरिया हा आजही सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने गंभीर प्रश्न असून, विशेषतः ज्या भागात डासांची उत्पत्ती वाढीस लागते अशा ठिकाणी त्याचा धोका अधिक असतो. हा आजार टाळता आणि बरा करता येण्यासारखा असला तरी जागरूकतेचा अभाव आणि उपचारात होणारा विलंब यामुळे अनेकांना त्याचा फटका बसत आहे. मलेरिया हा संसर्गजन्य आजार असून तो संक्रमित मादी ॲनोफिलीस डासांच्या चाव्यामुळे पसरतो. ताप, थंडी वाजणे, डोकेदुखी, घाम येणे आणि अशक्तपणा ही त्याची प्रमुख लक्षणे आहेत. योग्य वेळी उपचार न घेतल्यास हा आजार गंभीर रूप धारण करून शरीरातील महत्त्वाच्या अवयवांवर परिणाम करू शकतो.

# पाणीपुरवठ्याविना बांधकामांना परवानगी

## टँकरची बिले बिल्डरांकडूनच वसूल करा – नगरसेवक सचिन दोडके आक्रमक

### पुणे महानगरपालिका सभा पाणी प्रश्नांनी गाजली!

**पुणे - लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

वारजे माळेवाडी तसेच पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या विविध भागांमध्ये पाणीपुरवठ्याच्या गंभीर समस्येचा मुद्दा आता ऐरणीवर आला असून, यावर आज झालेल्या मुख्य सभेत जोरदार चर्चा रंगली. भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक सचिन दोडके यांनी हा प्रश्न ठामपणे उपस्थित करत प्रशासनाच्या नियोजनावर आणि कार्यपद्धतीवर टीका केली.

शहरातील अनेक भागांमध्ये अद्यापही नियमित पाणीपुरवठ्याची सुविधा उपलब्ध नसताना मोठ्या प्रमाणावर नवीन सोसायट्यांचे बांधकाम सुरू असल्याची बाब दोडके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. "पाणी ही मूलभूत गरज असताना, त्या संदर्भात कोणतीही ठोस व्यवस्था नसताना बांधकामांना परवानगी देणे म्हणजे नागरिकांना टँकरवर अवलंबून राहण्यास भाग पाडणे आहे," असे ते म्हणाले.

पाणीपुरवठ्याची कोणतीही व्यवस्था नसताना बांधकामांना परवानगी देण्याच्या निर्णयावर त्यांनी तीव्र आक्षेप नोंदवला.

सभागृहात चर्चेदरम्यान दोडके यांनी प्रशासनाला थेट सवाल करत, "मूलभूत सुविधा नसताना परवानग्या कशाच्या आधारे दिल्या जातात? आणि नागरिकांना टँकरच्या खर्चाचा भार का सहन करावा लागतो?" असा प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या या प्रश्नांना उत्तर देताना संबंधित अधिकारी समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. दोडके यांनी मांडलेल्या या विषयावर सभागृहात उत्तर देण्यासाठी पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप, अधीक्षक अभियंता अनिरुद्ध पावसकर उपस्थित होते. त्यांना या प्रश्नाची उत्तरे देताना अधिकारी निरुत्तर झाल्याचे सभागृहात पाहायला मिळाले. दरम्यान, दोडके यांच्या भूमिकेला सभागृहातील काही सदस्य तसेच स्थानिक नागरिकांकडूनही मोठा पाठिंबा मिळत आहे. पाण्यासारख्या मूलभूत प्रश्नावर प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घेऊन योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी जोर धरत होती. एकूणच, वारजे माळेवाडी परिसरासह समाविष्ट भागांमधील पाणीप्रश्नामुळे पुणे महानगरपालिकेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांवर पडणारा आर्थिक बोजा कमी करण्यासाठी आणि भविष्यात अशा समस्या टाळण्यासाठी प्रशासनाने जबाबदारीने पावले उचलणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. येत्या काळात या प्रश्नावर काय निर्णय घेतला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### टँकर साठी नागरिकांना भुर्दंड का, बिल्डरांनी बिले भरावी : दोडके

**सध्या अनेक ठिकाणी सोसायट्यांमधील नागरिकांना टँकरद्वारे पाणी घ्यावे लागत असून, त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागत आहे. मात्र, हा खर्च नागरिकांच्या माथी मारला जात असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. यावर तोडगा म्हणून दोडके यांनी स्पष्टपणे मागणी केली की, "जोपर्यंत पुणे महानगरपालिका नियमित पाणीपुरवठा सुरू करत नाही, तोपर्यंत संबंधित बांधकाम व्यावसायिकांनीच टँकरच्या पाण्याची सर्व बिले भरावीत." दोडके यांनी पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा (बिसल) नियोजनातील त्रुटींवरही बोट ठेवले. अपुरे नियोजन, अंमलबजावणीतील ढिसाळपणा आणि अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष यामुळेच हा प्रश्न गंभीर झाला असल्याचा आरोप त्यांनी केला.**

## भूमिगत कालव्याचे ३ कि.मी. काम पूर्ण; खडकवासला ते फुरसुंगी प्रकल्पाला गती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



शहरासह जिल्ह्यातील पाणीटंचाईवर दीर्घकालीन उपाय म्हणून हाती घेण्यात आलेल्या खडकवासला ते फुरसुंगी या भूमिगत कालवा प्रकल्पाला गती मिळाली असून या प्रकल्पातील सुमारे ३ किलोमीटर लांबीचे काम पूर्ण झाले आहे. प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, हा प्रकल्प टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे नियोजन असून उर्वरित कामही वेगाने सुरू आहे. पुणे शहराची वाढती पाण्याची गरज आणि वारंवार उद्भवणारी टंचाई लक्षात घेता हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

कालवा भूमिगत स्वरूपात केल्यामुळे पाण्याची गळती कमी होणार असून पाणी वाहतुकीची कार्यक्षमता वाढणार आहे. यामुळे शेतीसाठी पाणी उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच परिसरातील शेतकऱ्यांना याचा थेट फायदा होणार असल्याचे सांगितले जात आहे.

या प्रकल्पामुळे उघड्या कालव्यांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणींनाही आळा बसणार आहे. उघड्या कालव्यांमुळे होणारे अपघात, पाण्याची नासाडी आणि प्रदूषण यावर नियंत्रण मिळवता येणार आहे.

त्यामुळे हा प्रकल्प पर्यावरणाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा ठरत आहे. दरम्यान, कालवा मार्गावरील कामांमुळे काही ठिकाणी वाहतुकीवर परिणाम होत असला तरी काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांची स्थिती सुधारून वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

प्रशासनाने नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. एकूणच, खडकवासला ते फुरसुंगी भूमिगत कालवा प्रकल्प हा पुणे शहर आणि परिसरातील पाणी व्यवस्थापन सुधारण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरत असून पुढील काळात याचे सकारात्मक परिणाम दिसून येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पाण्याची तहान आणि टँकर माफियांचा सापळा

### टँकर माफिया - पाणीटंचाईमागील अदृश्य शक्ती?

चर्चा तर होणारच | अभिषेक मरगळे

**(दै. आरंभ पर्व)**

शहराला पाणीपुरवठा करणारे खडकवासला धरण आणि त्याच्या आसपासची गावं... पण या गावांतील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते, ही वस्तुस्थिती आजही बदललेली नाही. किकटवाडी, धायरी, नांदेड, न्हारे आणि परिसरातील इतर गावांमध्ये "घरात मोरी, पण पाणी नाही" अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.



धरणातून दररोज लाखो लिटर पाणी आधुनिक पाइपलाइनद्वारे शहरात पोहोचते. अत्याधुनिक पंपिंग स्टेशन, वितरण व्यवस्था आणि जलवाहिन्यांच्या जाळ्यामुळे दूरवरच्या भागांनाही पाणी मिळते. मात्र धरणाच्या अगदी जवळ असलेल्या गावांमध्ये नियमित नळजोडणी नसल्याने नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागते. उन्हाळा सुरू होताच ही समस्या तीव्र होते आणि पाण्यासाठी नागरिकांना मोठा आर्थिक बोजा सहन करावा लागतो.

या विसंगतीमागे अनेक कारणे आहेत. शहरी भागाला प्राधान्य देणारी धोरणे, ग्रामीण भागाकडे होणारे दुर्लक्ष, अपुरी पाइपलाइन आणि अपूर्ण जलयोजना. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे पाणीटंचाई. काही गावांचा महापालिकेत समावेश प्रलंबित असल्याने निधी आणि विकासकामे रखडलेली आहेत. वाढती लोकसंख्या आणि अनियोजित बांधकामामुळे उपलब्ध जलव्यवस्था अपुरी पडत आहे.

तज्ज्ञ सांगतात की, पाण्याची कमतरता नसून त्याचे नियोजन आणि वितरण ही खरी समस्या आहे. योग्य नियोजन केल्यास धरणाशेजारील गावांना सहजपणे पाणीपुरवठा करता येऊ शकतो. या संपूर्ण प्रश्नात सर्वाधिक चर्चेत असलेला मुद्दा म्हणजे टँकर माफियांचा वाढता हस्तक्षेप. स्थानिक नागरिकांच्या आरोपानुसार, "घरा घरात नळ आणि नियमित पाणीपुरवठा झाला, तर टँकर व्यवसाय पूर्णपणे बंद होईल. त्यामुळेच ही व्यवस्था कायम ठेवली जाते." टँकरद्वारे पाणीपुरवठा हा तात्पुरता उपाय असला, तरी काही ठिकाणी तोच कायमस्वरूपी व्यवसाय बनला आहे. पाणीटंचाई टिकून राहिल्यास टँकरची मागणी वाढते आणि त्यातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होते. परिणामी, काही ठिकाणी जलयोजना जाणीवपूर्वक रखडविल्या जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

"टँकर माफियांमुळेच पाणीटंचाई कायम आहे," असा थेट आरोप स्थानिकांकडून केला जातो. अनेक वेळा नागरिकांनी प्रशासनाकडे निवेदने दिली, आंदोलने केली, तरीही ठोस उपाययोजना होत नसल्याने हा संशय अधिक बळावतो.

टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहणाऱ्या नागरिकांना दरमहा मोठा खर्च करावा लागतो. याशिवाय पाण्याच्या गुणवत्तेचा प्रश्न, वेळेवर टँकर न मिळणे, आणि साठवणुकीच्या अडचणी. या सर्व समस्यांचा सामना करावा लागतो. पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी नागरिकांना पैसे मोजावे लागणे ही अत्यंत गंभीर बाब आहे.

एकीकडे धरणातील पाणी शहराच्या विकासासाठी वापरले जात असताना, दुसरीकडे त्याच पाण्याच्या सावलीत राहणारे नागरिक तहानलेले राहणे ही मोठी शोकांतिका आहे. "जवळ पाणी, तरीही टंचाई" हा विरोधाभास केवळ नैसर्गिक नाही, तर व्यवस्थापनातील त्रुटी आणि हितसंबंधांचा परिणाम असल्याची भावना बळावत आहे.

घराघरात नळ आणि नियमित पाणीपुरवठा झाला, तर टँकर माफियांचे अस्तित्वच धोक्यात येईल आणि कदाचित याच भीतीमुळे ही समस्या कायम ठेवली जात असल्याचा प्रश्न आज सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

आता प्रशासनाने ठोस निर्णय घेऊन या प्रश्नाला कायमचा पूर्णविराम देणे आवश्यक झाले आहे. नाहीतर, विकासाच्या छायेत या गावांची तहान अशीच कायम राहणार आहे.

### उपाय काय?

- या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी काही ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.
- ग्रामीण भागासाठी स्वतंत्र आणि सक्षम जलपुरवठा योजना
- पाइपलाइन नेटवर्कचा विस्तार आणि दुरुस्ती
- जलसंधारण प्रकल्पांना प्राधान्य
- टँकर व्यवसायावर नियंत्रण आणि पारदर्शकता
- प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक यांच्यात समन्वय

### धरणाशेजारील गावांचा पाणीप्रश्न कायम

**शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण परिसरातील गावांमध्ये अद्यापही पाणीटंचाईची समस्या कायम असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महानगरपालिकेत समावेश होऊनही खडकवासला, किरकटवाडी, कोल्हेवाडी, नांदोशी, नांदेड व धायरी या भागांमध्ये नियमित व पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याचे चित्र आहे. धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी शहरातील विविध भागांना पुरवले जात असतानाच, धरणाच्या आसपासच्या गावांमध्ये मात्र नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक तीव्र बनत असून पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, खडकवासला ते फुरसुंगी या कालवा बोगद्याद्वारे पाणीपुरवठा करण्याची योजना प्रस्तावित असल्याने स्थानिकांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. "आमच्या भागालाच पुरेसा पाणीपुरवठा होत नसताना इतर भागांना पाणी कसे देणार?" असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. यासंदर्भात स्थानिक नागरिक पै. राहुल मुरलीधर मते यांनी संतप्त प्रतिक्रिया देताना सांगितले, "खडकवासला धरणातून समाविष्ट गावांना पाणीपुरवठा होतो, हे खरे असले तरी आमचा पाणीप्रश्न अजूनही सुटलेला नाही. पुणे महानगरपालिकेत समावेश होऊनही खडकवासला, किरकटवाडी, कोल्हेवाडी, नांदोशी, नांदेड व धायरी भागाला पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. त्यातच खडकवासला ते फुरसुंगी हा कालवा बोगद्याद्वारे पाणीपुरवठा करण्याची योजना आहे. मग आमच्या भागातील नागरिकांना मुबलक पाणी देता येत नसेल, तर हे कितपत योग्य आहे? आधी आमच्या भागातील पाणीपुरवठा सुरळीत करा, ही आमची ठाम मागणी आहे." स्थानिकांकडून वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याची तक्रार करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर "जवळ पाणी, तरीही टंचाई" हा विरोधाभास दूर करण्यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी जोर धरत आहे.**

**- पै .राहुल मुरलीधर मते, स्थानिक नागरिक**

## थोडक्यात पण महत्वाचे



## समावेशक कौशल्य परिसंस्थांसाठी जागतिक नेत्यांचे आवाहन

**पुणे (आरंभ पर्व) : भारताच्या कौशल्य व शिक्षण क्षेत्रासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत, सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (SSPU), पुणे येथे 'जेंडर इन्क्लुजन व स्किल डेव्हलपमेंट' विषयावरील आशियातील पहिल्या युनेस्को चेअरचे उद्घाटन करण्यात आले. हे उद्घाटन केंद्रीय कौशल्य विकास व उद्योजकता राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) तसेच शिक्षण राज्यमंत्री श्री जयंत चौधरी यांच्या हस्ते पार पडले. या उपक्रमाद्वारे समावेशक, भविष्याभिमुख आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक कौशल्य परिसंस्था उभारण्याच्या भारताच्या बांधिलकीला अधोरेखित करण्यात आले. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे तसेच नॉर्वेच्या भारतातील राजदूत मोनिका नागेलगॉर्ड या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या युनेस्को चेअरचे नेतृत्व SSPU च्या प्रो-चॅन्सलर डॉ. स्वाती मुजुमदार करत असून, कौशल्य विकास क्षेत्रातील त्यांच्या दूरदृष्टीमुळे या उपक्रमाला विशेष दिशा मिळाली आहे. SSPU ने उद्योग-संलग्न कौशल्य प्रशिक्षणाचा अभिनव मॉडेल विकसित केला असून, वंचित घटकांतील युवक-युवतींना मोठ्या प्रमाणावर रोजगाराभिमुख प्रशिक्षण दिले आहे.**




## मित्सुबिशी इलेक्ट्रिक इंडियाच्या वतीने जागतिक वसुंधरा दिन केला साजरा

**पुणे (आरंभ पर्व) : मित्सुबिशी इलेक्ट्रिक इंडियाने तलाव संवर्धनाच्या तिच्या सुरू असलेल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) उपक्रमाचा एक भाग म्हणून अर्थवॉच इन्स्टिट्यूट इंडियाच्या सहकार्याने जागतिक वसुंधरा दिन २०२६ साजरा केला. या अंतर्गत पुण्याजवळील तळेगाव दाभाडे तलावावर कर्मचाऱ्यांचा प्रत्यक्ष सहभाग असलेल्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून कर्मचाऱ्यांनी तलावाकाठी आयोजित केलेल्या मार्गदर्शनाखालील 'वॉक अँड टॉक' सत्रात भाग घेतला. यामध्ये डिजिटल फील्ड गाईड्स आणि इंटरॅक्टिव्ह ॲप्लिकेशन्सच्या साहाय्याने त्यांनी शहरी नील व हरित जागांचे महत्त्व जाणून घेतले.यानंतर तलावाचे पर्यावरण सुधारण्याच्या उद्देशाने स्वच्छता मोहीम आणि वृक्षारोपण उपक्रम राबवण्यात आला.यावेळी कर्मचाऱ्यांनी कार्बन आणि वॉटर फूटप्रिंटशी संबंधित सत्रातही भाग घेतला, यात त्यांना स्वयंचलित हवामान केंद्रे, हवेची गुणवत्ता प्रणाली आणि पाण्याची गुणवत्ता मूल्यांकन तंत्रज्ञान यांसारख्या साधनांच्या प्रात्यक्षिकांच्या साहाय्याने पर्यावरणावर पडणारा परिणाम आणि तो कमी करण्याविषयी व्यावहारिक माहिती मिळाली.**

## महा मेट्रो आणि ओएनडीसीत भागीदारी

**पुणे (आरंभ पर्व) : पेटीएम (वन ९७ कम्युनिकेशन्स लिमिटेड) ने महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा मेट्रो) आणि ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स (ओएनडीसी) सोबत भागीदारी करून पुणे आणि नागपूरमधील मेट्रो प्रवाशांसाठी मोबाइल क्यू आर तिकीट सेवा सुरू केली आहे. या सुविधेमुळे प्रवासी आता थेट पेटीएम ॲपवर मेट्रो तिकीट बुक करू शकतात आणि स्टेशनवर प्रवेशासाठी क्यू आर कोड मिळवू शकतात. यामुळे फिजिकल टोकनची गरज उरत नाही आणि स्टेशनवरील प्रतीक्षा वेळ कमी होतो, ज्यामुळे प्रवास अधिक जलद आणि सोयीस्कर होतो. ही सेवा दोन्ही शहरांमधील दररोज 3 लाखांहून अधिक प्रवाशांना लाभदायक ठरण्याची अपेक्षा आहे.पेटीएम प्रवक्त्यांनी सांगितले, "ही भागीदारी पुणे आणि नागपूरमधील प्रवाशांसाठी दैनंदिन प्रवास अधिक सोपा करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. मोबाइल क्यू आर तिकीट सेवेमुळे वापरकर्त्यांना पेटीएम ॲपवर तिकीट त्वरित मिळते, ज्यामुळे बुकिंगपासून प्रवासापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया अधिक जलद आणि सोयीस्कर होते."**



## शाही थाटात पार पडला साखरपुड्याचा भव्य सोहळा !

**पुणे (आरंभ पर्व) : मसालाकिंग धनंजय दातार आणि त्यांच्या पत्नी वंदना दातार यांनी आपल्या सुपुत्र रोहित दातार आणि सानिया नरवाडे यांच्या साखरपुड्याचा भव्य सोहळा मुंबईतील प्रतिष्ठित ताज लँड्स एंड येथे मोठ्या थाटामाटात आयोजित केला. या देखण्या संध्याकाळी कुटुंबीय, मित्रमंडळी आणि शुभेच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित राहून नव्या आयुष्याच्या प्रवासाला सुरुवात करणाऱ्या या जोडप्यावर आशीर्वादांचा वर्षाव केला. या सोहळ्यात एक अप्रतिम संगीतमय कार्यक्रम रंगला, ज्यामध्ये प्रसिद्ध गायक सुदेश भोसले आणि वैशाली सामंत यांच्या सादरीकरणांनी वातावरणात उत्साह आणि ऊर्जा भरली. या संगीतसंध्येला आणखी रंगत आणली ती सिद्धांत भोसले यांच्या मधुर आवाजाने, ज्यांनी आपल्या गायनाने उपस्थितांची मनं जिंकली. या खास प्रसंगी वराची आई वंदना दातार यांनी तालावर नृत्य करत आपल्या आनंदाची आणि उत्साहाची सुंदर अभिव्यक्ती केली, हा क्षण सर्वांसाठी खास ठरला. कार्यक्रमात प्रसिद्ध अभिनेत्री 'नटरंग' फेम सोनाली कुलकर्णी आणि मानसी नाईक यांच्या जोशपूर्ण नृत्य सादरीकरणांनी रंगत आणखी वाढवली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ चांदेकर यांनी केले, त्यांच्या उत्साही आणि आकर्षक उपस्थितीमुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.**

# जळगावात मनसेची संघटनात्मक बैठक उत्साहात

**जळगाव (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या जळगाव लोकसभा मतदारसंघाची महत्त्वपूर्ण संघटनात्मक बैठक आज पद्मालय विश्रामगृह येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. नवनिर्वाचित संपर्क अध्यक्ष संदीप पाचंगे (मुंबई) व आशिष साबळे (पुणे) यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत जिल्ह्याचा सखोल आढावा घेण्यात आला असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना सक्रिय होण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



या बैठकीत जळगाव शहरासह पाचोरा, भडगाव, चाळीसगाव, एरंडोल, पारोळा व धरणगाव या तालुक्यांतील पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती लावली होती. प्रत्येक तालुक्याची संघटनात्मक ताकद, स्थानिक अडचणी आणि पुढील नियोजनावर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. मार्गदर्शन करताना संदीप पाचंगे व आशिष साबळे यांनी संघटन बळकटीकरणावर विशेष भर दिला. त्यांनी खालील मुद्द्यांवर पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले:

सक्रियता: स्थानिक पातळीवर जनतेचे प्रश्न सोडवून पक्षाची भूमिका ठळकपणे मांडा. नवे नेतृत्व: नव्या दमाच्या कार्यकर्त्यांना संधी देऊन संघटनेची व्याप्ती वाढवा.

नोंदणी मोहीम: सभासद नोंदणी मोहीम प्रभावीपणे राबवून जास्तीत जास्त लोकांना पक्षाशी जोडा. समन्वय: आगामी निवडणुका लक्षात घेता प्रत्येक पदाधिकाऱ्याने जबाबदारीने व समन्वयाने काम करणे गरजेचे आहे. "ही बैठक संघटनेला नवसंजीवनी देणारी ठरेल. कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता आगामी काळात जळगाव जिल्ह्यात मनसेचे चित्र अधिक सक्षम दिसेल." या बैठकीला मनसे जिल्हाध्यक्ष ॲड. जमील देशपांडे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष गोकुंदा रोटे, शहराध्यक्ष विनोद शिंदे, किरण तळले , उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ललित शर्मा, राजेंद्र निकम, आशुतोष जाधव, चेतन पवार, एरंडोल तालुकाध्यक्ष विशाल सोनार, विकास पात्रे, खुशाल ठाकूर, राहुल चव्हाण, सतीश सैंदाणे, संजय मोती, शाखाध्यक्ष युसूफ खाटीक यांच्यासह मोठ्या संख्येने महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

## कॅम्पस बीट्स रिटर्न्स, प्रेमाची नवीन बाजू - ट्रेलर प्रसिद्ध

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

ॲमेझॉन एमएक्स प्लेयर, भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने, तब्बल पाच सीझन मिळवलेल्या अफाट प्रेमाच्या जोरावर, आज कॅम्पस बीट्स रिटर्न्सचा बहुप्रतिक्षित ट्रेलर प्रदर्शित केला. बनिजय एशियाने निर्मित केलेली ही मालिका पल्की मल्होत्राने लिहिली असून सर्जनशीलरित्या रचली आहे. तसेच अनिरुद्ध राजदेरकर यांनी ती दिग्दर्शित केली आहे. या कलाकृतीत शांतनु माहेश्वरी, श्रुती सिन्हा, सहज सिंग चहल, दीपांकना दास, अदनान अहमद यांच्यासोबत पारस कलनावत, चाँदनी शर्मा आणि सुवंश धर अशा कलाकारांचा समावेश आहे. नाट्यमयता आणि भावना या दोन्हींवर भर देत, चाहत्यांची आवडती फ्रँचायझी अधिक दिलदार, नाट्य-नृत्याने बहरलेला धमाकेदार आणि अविस्मरणीय अनुभव देणार आहे. परंतु यावेळी, केवळ कथनाच्या ओघाने कथा पुढे जाणार नसून ती पूर्णपणे डोक्यात घोंगावत राहील. प्रेमाचा नवीन पदर उलगडताना ट्रेलरमध्ये इशान आणि नेत्राच्या प्रवासातील




भावनिक वळण पाहायला मिळते. एकीकडे त्यांचे प्रेम फुलायला लागते मात्र नियतीच्या कल्पना निराळ्या असतात. नेत्रा एक नवीन जीवन सुरू करताना दिसते आणि सुमेरच्या रुपाने तिला नवीन प्रेम लाभते. तिला परत आपल्या जीवनात आणण्याचा निर्धार करून, इशान तिचा पाठलाग करतो. परंतु गोष्टी पूर्वीसारख्या सोप्या राहत नाहीत, नवीन समीकरणे तयार होऊ लागतात. जे उलगडते ते प्रेम, गोंधळ आणि बदलत्या बंधांचे मिश्रण! जिथे भूतकाळ दफन होण्यास तयार नसतो.

हाय-व्होल्टेज डान्स फेस-ऑफ, स्लो-बर्न स्पर्धा आणि पार्श्वभूमीत बंदिस्त होण्यास नकार देणारे एक रहस्य, हा सीझन केवळ अपेक्षा वाढवणारा नाही तर कथेची पकड घट्ट करतो.

## भूपेंद्र मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष भूपेंद्र मोरे यांचा वाढदिवस यंदा अत्यंत साधेपणाने साजरा करण्यात आला. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनामुळे कोणतेही औपचारिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले नाहीत. मात्र, साधेपणातही नागरिकांच्या प्रेमाचा ओघ मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाला.

भूपेंद्र मोरे यांनी गेल्या काही वर्षांत नऱ्हे परिसरातील विविध सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी केलेल्या कामाची दखल घेत नागरिक मोठ्या संख्येने त्यांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. स्थानिक पाणी, रस्ते, स्वच्छता यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवून नागरिकांना दिलासा दिला असल्याचे अनेकांनी यावेळी सांगितले.

"यश-अपयश हे संघर्षाचे गमक आहे, पण जनतेसाठी काम करत राहणे हेच खरे समाधान आहे," अशी भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली. मोरे यांनी पुढील काळातही जनतेच्या प्रश्नांसाठी तत्पर राहावे, अशी अपेक्षाही उपस्थितांनी व्यक्त केली.

वाढदिवसानिमित्त अनेक माता-भगिनींनी पारंपरिक पद्धतीने ओवाळून त्यांना आशीर्वाद दिले. तसेच तरुण वर्ग, कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नागरिकांनीही त्यांना प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या. एकूणच, कोणत्याही मोठ्या सोहळ्याविना साजरा झालेला हा वाढदिवस नागरिकांच्या प्रेमामुळे विशेष ठरला. यावेळी राजकीय, सामाजिक, पत्रकारिता, क्रीडा क्षेत्रातील अनेक मंडळी उपस्थित होती. या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिलेल्या सर्व नागरिकांचे व मित्र परिवाराचे भूपेंद्र मोरे यांनी आभार मानले.

### मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त वीस

**भूपेंद्र मोरे यांनी वाढदिवसानिमित्त वीस गरीब कुटुंबांना बांधकाम कामगार कल्याण मंडळातर्फे मंजूर झालेली भांडी वाटप करण्यात आली. मोरे यांच्या जनसंपर्क कार्यालयातर्फे अनेक माता-भगिनींना शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे. त्यापैकी 20 कुटुंबांना भांडी वाटप करण्यात आले .वाढदिवसानिमित्त केलेल्या या अनोख्या मदतीमुळे उपस्थित माता-भगिनी भारावून गेल्या. एक नवा आदर्श भूपेंद्र मोरे यांनी यानिमित्त घालून दिला आहे.**

## नेटवर्क्स डिजिटल जीवनाला कसे सक्षम करतात हे दर्शवणारे ट्रेंड्स

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील कनेक्टिव्हिटी आता वेगळेपण दर्शवणारा घटक राहिलेली नाही; ती एक पायाभूत सुविधा बनली आहे. वीज किंवा बँकिंगप्रमाणेच, दैनंदिन जीवनाला आकार देणाऱ्या डिजिटल क्षणांना चालना देत, ती विश्वसनीयपणे, सातत्याने आणि कोणत्याही व्यत्ययाशिवाय कार्यरत राहणे अपेक्षित आहे. आजचा बदल हा वेगवान नेटवर्क्सबद्दल कमी आणि वाढत्या डिजिटल समाजाचा कणा म्हणून कनेक्टिव्हिटीच्या भूमिकेबद्दल अधिक आहे. अपेक्षा बदलत असल्यामुळे, सेवा पुरवठादारांवर सेवा वितरणाच्या पलीकडे जाऊन, स्वतःला अखंड आणि नेहमी उपलब्ध असणाऱ्या अनुभवांचे विश्वसनीय प्रवर्तक म्हणून स्थापित करण्यासाठी दबाव येत आहे. वेगापेक्षा विश्वसनीयता अधिक महत्त्वाची आहे- ग्राहक आता बँडविड्थबद्दल क्वचितच बोलतात. त्याऐवजी, त्यांचे लक्ष व्यत्ययाकडे जाते. बँकिंग अलर्ट चालू असताना कॉल ड्रॉप होणे, डिजिटल पेमेंट करताना विलंब होणे, किंवा कामाच्या मध्येच नेटवर्कमध्ये अडथळा येणे, याकडे आता गैरसोय म्हणून पाहिले जात नाही, तर पायाभूत सुविधांचे अपयश म्हणून पाहिले जाते. यामुळे अपेक्षांचे स्वरूपच बदलले आहे. आता नेटवर्कचे मूल्यमापन सातत्य, अपटाइम आणि पूर्वानुमानक्षमतेवर केले जाते, सर्वोच्च कामगिरीवर नाही. आजची सर्वोत्तम कनेक्टिव्हिटी ती आहे, ज्याबद्दल वापरकर्त्यांना अजिबात विचार करण्याची गरज भासत नाही. भारताचा डिजिटल विस्तार वाढल्याबरोबर जोखीमही वाढल्या आहेत. स्कॅम कॉल्स, फिशिंग प्रयत्न आणि आर्थिक फसवणूक आता दैनंदिन जीवनाचा भाग बनले आहेत. ग्राहकांना आता सेवा प्रदात्यांकडून फक्त प्रवेश नव्हे तर संरक्षणाचीही अपेक्षा आहे. डिजिटल वापर वाढत असताना, सुरक्षितता ही वापरकर्त्याची जबाबदारी न राहता कनेक्टिव्हिटीचा अंगभूत भाग बनली आहे. याला प्रतिसाद म्हणून, ऑपरेटर्स एआय-आधारित नेटवर्क बुद्धिमत्तेचा वापर करून मोठ्या प्रमाणावर सुरक्षा प्रदान करत आहेत. यात संशयास्पद कॉल्स आणि संदेश ओळखून ब्लॉक करणारी प्रणाली, संभाव्य फसवणुकीबद्दल रिअल-टाइम अलर्ट, आणि उदयोन्मुख धोके ओळखण्यासाठी सतत नेटवर्क मॉनिटरिंग यांचा समावेश आहे. हे उपाय वापरकर्त्यांपर्यंत धोके पोहोचण्यापूर्वीच त्यांना अडवतात.स्पर्धात्मक फायदा आता वेगळ्या फीचर्सपेक्षा समस्या सोडवण्यावर आधारित आहे.

आधुनिक कनेक्टिव्हिटी सेवा ग्राहकांच्या अडचणी, सुरक्षा, साधेपणा आणि मानसिक शांतता यांवर आधारित तयार केल्या जातात. हे उद्योगातील व्यापक बदल दर्शवते यश आता योजना विकण्यात नसून दैनंदिन डिजिटल अनुभवातील अडथळे कमी करण्यात आहे.

## समिती स्थापन करण्याचे उपमहापौरांचे आदेश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जन्मद्वीशताब्दी, चवदार तळे सत्याग्रहाची शताब्दी आणि महात्मा फुले यांच्या नगरसेवक पदाची दीडशे वर्ष या निमित्ताने महापालिकेच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे व उपक्रमांचे आयोजन करण्यास स्थायी समितीने मान्यता सर्वसाधारण सभेत दिली असून या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी विशेष समिती स्थापन करण्याचे आदेश उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सभापती पदावर असताना दिले आहेत.

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जन्मद्वीशताब्दी, चवदार तळे सत्याग्रहाची शताब्दी आणि महात्मा फुले यांच्या नगरसेवक पदाची दीडशे वर्ष यामुळे हे वर्ष सामाजिक सुधारणा वर्ष म्हणून साजरे करावे. महात्मा फुले आणि महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी स्मृतींना उजाळा मिळावा यासाठी महापालिकेच्या वतीने सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जावे, अशी सूचना परशुराम वाडेकर यांनी केली होती. या प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली आहे.

# हरवलेल्यांना शोधून देणारे जनसेवक शिवाभाऊ पासलकर

## हजाराहून अधिक व्यक्तींना कुटुंबाशी जोडले

**• शब्दांकन •**

**लक्षण साबळे, निवासी संपादक**

**८६०५२८४२७२**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हरवलेल्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना पुन्हा कुटुंबाशी जोडण्याचे मोलाचे कार्य करणारे जनसेवक शिवाभाऊ पासलकर हे आज महाराष्ट्रभर परिचित नाव बनले आहे. "महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुप" या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी आतापर्यंत एक हजाराहून अधिक हरवलेल्या व्यक्तींचा शोध लावून अनेक कुटुंबांना दिलासा दिला आहे.

पानशेत येथील मूळ रहिवासी असलेले शिवाभाऊ पासलकर सध्या पुण्यात स्थायिक असून, समाजसेवेची जिद्द आणि ध्येय मनात ठेवून त्यांनी हे कार्य उभे केले आहे. त्यांच्या कामाची सुरुवात एका वैयक्तिक प्रसंगातून झाली. त्यांच्या एका मित्राची बहिण अचानक बेपत्ता झाली होती. त्या वेळी त्यांनी स्वतः पुढाकार घेत शोधमोहीम राबवली आणि तिचा शोध लावण्यात यश मिळवले. या घटनेनंतर त्यांनी हरवलेल्या व्यक्तींचा शोध घेण्याचे



कार्यच आपल्या आयुष्याचे ध्येय बनवले.

शिवाभाऊ सोशल मीडियाचा प्रभावी वापर, विविध जिल्ह्यांतील स्वयंसेवकांचे जाळे जनतेची मदत सोशल मीडियाची मदत, तसेच पोलीस प्रशासनाशी समन्वय साधत सतत शोधमोहीम राबवतात. हरवलेल्या व्यक्तींची माहिती मिळताच ते तातडीने हालचाली सुरू करतात. अनेक वेळा रात्री-दिवस अथक प्रयत्न करून त्यांनी हरवलेल्या व्यक्तींना सुरक्षित त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचवले आहे.

विशेष म्हणजे, हे सर्व कार्य ते कोणतीही आर्थिक अपेक्षा न ठेवता पूर्णपणे निस्वार्थ भावनेतून करतात. त्यांच्या या सेवेमुळे अनेक कुटुंबांना पुन्हा आपले हरवलेले सदस्य मिळाले असून, त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद हा शिवाभाऊंसाठीच मोठा सन्मान ठरतो.

शिवाभाऊ पासलकर यांचे कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी असून, त्यांच्या या निस्वार्थ सेवेला सर्व स्तरांतून कौतुक मिळत आहे. भविष्यातही अधिक व्यापक पातळीवर हे कार्य करण्याचा त्यांचा मानस असून, अधिकाधिक लोकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुप ही एक स्वयंसेवी संस्था आहे जी बेपत्ता झालेल्या व्यक्तींचा शोध घेण्यात मदत करते. या ग्रुपचे संस्थापक शिवाभाऊ पासलकर आहेत, जे गेल्या 15 वर्षांपासून निःस्वार्थपणे काम करत आहेत. आपल्याला बेपत्ता झालेल्या व्यक्तीचा शोध घ्यायचा असेल तर तुम्ही या ग्रुपशी संपर्क साधू शकता.

### काम कसे चालते?

- **बेपत्ता झालेल्या व्यक्तीची माहिती सोशल मीडियावर प्रसारित केली जाते.**
- **व्हॉट्सॲप, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम इत्यादी माध्यमांवर माहिती शेअर केली जाते.**
- **संबंधित कुटुंबीयांना पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा सल्ला दिला जातो.**
- **हरवलेल्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर केला जातो.**

### आतापर्यंतचे काम

- **1000 हजाराऊन हून अधिक बेपत्ता लोकांना शोधण्यात मदत केली आहे.**
- **लहान मुले, मुली, ज्येष्ठ नागरिक इतर अनेक व्यक्तींचा शोध लागला आहे. 9326425858**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे




### पीएम व्हिजन टू आर्टटर्न व्हिजन इन टू आर्ट स्पर्धेचा बक्षीस वितरण संपन्न

मुंबई (आरंभ पर्व) : लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग आणि, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या वतीने संपूर्ण भारत देशात 'पीएम व्हिजन टू आर्ट' स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी प्रभादेवी मुंबई येथे राज्याचे संस्कृतीक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ७५ विजेत्यांचा पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मा. मंत्री आशिष शेलार, सांस्कृतिक विभाग सचिव किरण कुलकर्णी, दादासाहेब फाळके चित्रनगरी व्यवस्थापकीय संचालिका स्वाती म्हसे पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर कॉफी टेबल बुकचे अनावरण करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मंत्री आशिष शेलार म्हणाले की, "मला जाणीवपूर्वक याचा उल्लेख करावा लागेल की, आपल्या देशातील युवकांमध्ये, युवतींमध्ये किंवा नागरिकांमध्ये प्रचंड सृजनशीलता, नाविन्यता, कौशल्यता आणि कल्पकता आहे. माननीय पंतप्रधान मोदीजी नेहमी म्हणतात, एक सॉफ्ट पॉवर या पद्धतीची ताकद आपल्या भारतामध्ये आहे. त्याचं चित्र आणि अनुभूती आपल्याला प्रदर्शनाला भेट दिल्यावर येते."




### विद्यार्थ्यांच्या एकजुटीचा मोठा विजय

पुणे (आरंभ पर्व) : Savitribai Phule Pune University येथे विद्यार्थ्यांच्या एकजुटीचा मोठा विजय पाहायला मिळाला असून, नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (एनएसयूआय) तर्फे सुरू करण्यात आलेले बेमुदत उपोषण आंदोलन अखेर यशस्वी ठरले आहे. विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या सर्व प्रमुख मागण्या मान्य केल्याने आंदोलनाची सकारात्मक सांगता झाली. दि. २२ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेल्या या आंदोलनात विद्यार्थ्यांनी दोन दिवस उपाशी राहून तीव्र उन्हात शांततामय पद्धतीने लढा दिला. मात्र सुरुवातीच्या टप्प्यात प्रशासनाकडून पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. आंदोलनाच्या पहिल्या दिवशी विद्यापीठाचा एकही प्रतिनिधी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी आला नाही. दुसऱ्या दिवशीही कुलसचिव उपस्थित असूनही त्यांनी आंदोलनस्थळी भेट देण्याचे टाळले, यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. परिस्थिती अधिक तीव्र झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी सलग तीन तास कडक उन्हात उपोषण सुरू ठेवले. अखेर विद्यार्थ्यांच्या ठाम भूमिकेमुळे प्रशासनाला आंदोलनाची दखल घ्यावी लागली. या आंदोलनाला काँग्रेसचे वरिष्ठ नेते Abhay Chhajed यांनी भेट देत पाठिंबा दर्शवला. तसेच जांबुवंत मनोहर, भाऊसाहेब आजबे आणि सीमा गुट्टे यांनीही आंदोलनस्थळी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना समर्थन दिले.

### मॉन्ट्रा इलेक्ट्रिककडून इलेक्ट्रिक स्मॉल ट्रक श्रेणीचा विस्तार



पुणे (आरंभ पर्व) : मॉन्ट्रा इलेक्ट्रिक या मुरुगप्पा ग्रुपच्या क्लीन मोबिलिटी ब्रँडने आज आपल्या ईएससीव्ही पोर्टफोलिओच्या धोरणात्मक विस्ताराची घोषणा केली. यामध्ये EVIATOR 350 (32kWh) आणि EVIATOR 350L+ (50kWh) या दोन नवीन व्हेरिएंट्सचा समावेश आहे. हा विस्तार प्रत्यक्ष व्यवहारातील अनुभवावर आधारित आहे. मॉन्ट्रा इलेक्ट्रिकच्या ६०० हून अधिक वाहनांच्या ताफ्याने आतापर्यंत ६५ लाख किलोमीटरपेक्षा जास्त प्रवास केला आहे. या व्यापक अनुभवामुळे कंपनीला विविध व्यावसायिक गरजा आणि ड्यूटी-सायकल समजून घेता आली, ज्या आधारावर कंपनीने इलेक्ट्रिक व्यावसायिक वाहनांच्या उपयुक्ततेला अधिक नव्या उंचीवर नेले आहे.

### 'भरोसे का अ‍ॅड्रेस' ५० नवीन कार्यालयांचे उद्घाटन

AXIS MAX LIFE INSURANCE

पुणे (आरंभ पर्व) : ॲक्सिस मॅक्स लाइफ इन्शुरन्स लिमिटेडने जी पूर्वाश्रमीची मॅक्स लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड आहे तिने विशेषतः उत्तरप्रदेश, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि आसाम अशा विविध ठिकाणी टियर २ आणि टियर ३ बाजारपेठांमध्ये ५० नवीन एजन्सी कार्यालये उघडून आपल्या वितरण जाळ्याचा विस्तार करण्याची घोषणा केली आहे. हा उपक्रम आयआरडीएआयच्या '२०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा' मोहिमेसाठी प्रोत्साहक असून त्यामुळे जीवनविमा फक्त गुंतवणुकीची गोष्ट न ठरता मुख्य गरज असल्याचे स्पष्ट होते. भारताच्या उदयोन्मुख आर्थिक रचनांमध्ये आपल्या एजन्सी नेटवर्कचा विस्तार करताना ॲक्सिस मॅक्स लाइफचे उद्दिष्ट संरक्षणातील अंतर कमी करणे आणि आर्थिक समावेशकतेला चालना देणे तसेच अगदी दुर्गम भागांपर्यंत पोहोचण्याचे आहे. ॲक्सिस मॅक्स लाइफचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुमित मदन म्हणाले, "आर्थिक संरक्षण भारताच्या कानाकोपऱ्यात पोहोचावे यासाठी आमची बांधिलकी आहे. आमच्या ५० कार्यालयांची भर पडल्याने उदयोन्मुख भारताच्या संरक्षणविषयक गरजांना थेट प्रतिसाद देण्यासाठी टियर २ आणि टियर ३ बाजारपेठांवर आमचे लक्ष केंद्रित झाल्याचे दिसून येते. विमा संरक्षणाच्या पलीकडे जाऊन 'भरोसे का अ‍ॅड्रेस' कार्यालये स्थानिक समुदायांसाठी रोजगाराच्या महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध करून देतील. प्रत्येक शाखेला संरचित भरती आणि सक्षमीकरण कार्यक्रमाद्वारे पाठबळ दिले जाईल, नवीन सल्लागारांना डिजिटल साधने आणि संबंधित आर्थिक सल्ला देण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण दिले जाईल. हा स्थानिक दृष्टीकोन या गोष्टीची खात्री करतो की आर्थिक सल्ल्यात स्थानिक परंपरांचे प्रतिबिंब पडेल आणि देशभरातील कुटुंबांच्या आर्थिक प्रवासात अखंडपणे सहभागी होईल. हे उद्घाटन हा वित्तीय वर्ष २६ चा महत्त्वाचा टप्पा असला तरी, 'भरोसे का अ‍ॅड्रेस' भारताच्या संरक्षण परिसंस्थेसाठी दीर्घकालीन वचनबद्धतेचे प्रतिनिधित्व करतो. हा विस्तार सातत्यपूर्ण, उच्च दर्जाचे संरक्षण उपाय वितरीत करण्यास सक्षम असलेल्या भविष्यासाठी सज्ज एजन्सी नेटवर्कला आधार देण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा म्हणून काम करेल.

# सलूनमध्ये घुसून गोळीबार; दोघे जखमी




पुणे (दै. आरंभ पर्व)


पुण्यातील वारजे माळवाडी परिसरात शुक्रवारी रात्री भरवर्दळीच्या वेळी घडलेल्या धक्कादायक गोळीबाराच्या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. ड्रग्स प्रकरणातील फरार आरोपीसह टोळीने सलूनमध्ये घुसून एका तरुणावर अंदाधुंद गोळीबार केला. या घटनेत लक्ष्य केलेल्या तरुणासह एका निष्पाप नागरिकालाही गोळी लागून दोघे जखमी झाले आहेत.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, निहाल शिंदे हा तरुण वारजे माळवाडी येथील एका सलूनमध्ये बसला असताना सायंकाळी सुमारे सातच्या सुमारास ५ ते ६ जणांचे टोळके दुचाकीवरून घटनास्थळी दाखल झाले. पूर्ववैमनस्यातून त्यांनी थेट सलूनमध्ये घुसून निहालवर गोळीबार सुरू केला. अचानक झालेल्या या अंदाधुंद गोळीबारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या गोळीबारात अमोल आढाव हा निष्पाप तरुणही जखमी झाला. तो केवळ केस कापण्यासाठी सलूनमध्ये आला असताना त्याला गोळी लागली. दोन्ही जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

दरम्यान, घटनेच्या वेळी परिसरात पेट्रोलिंग करत असलेल्या वारजे माळवाडी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यावेळी एका आरोपीला घटनास्थळीच पकडण्यात पोलिसांना यश आले, तर इतर आरोपी पसार झाले आहेत. प्राथमिक तपासात, या गोळीबारामागे जुना वाद कारणीभूत असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, या हल्ल्यात ड्रग्स प्रकरणातील फरार आरोपीचा सहभाग असल्याची माहिती समोर येत असल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. नुकतेच उत्तमनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ड्रग्स प्रकरण उघडकीस आले होते, त्यानंतर लगेचच अशा प्रकारे गोळीबाराची घटना घडल्याने कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी जप्त केले असून फरार आरोपींचा माग काढण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# मातंग समाज उपवर्गीकरणासाठी पुण्यात एकजूट



पुणे (दै. आरंभ पर्व)

महाराष्ट्रातील अ, ब, क, ड उपवर्गीकरणाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निकालाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी मातंग समाजात मोठी चळवळ उभी राहत आहे. या पार्श्वभूमीवर मातंग समाजाचे नेते आणि कार्यकर्त्यांनी आमदार अमित गोरखे यांची भेट घेऊन त्यांना ठाम पाठिंबा दर्शविला. या भेटीदरम्यान पुणे शहर जिल्हा मातंग समाज उपवर्गीकरणाच्या लढ्यात पूर्ण ताकदीने उभा असल्याचे स्पष्ट करण्यात आले. समाजातील सर्व स्तरांतील नेते, कार्यकर्ते आणि तरुणांनी एकत्र येत उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीसाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला.

मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते शंकर भाऊ तडाखे आणि पुणे शहर जिल्हा मातंग समाजाचे सचिव दीपक भाऊ कसबे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, "सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा समाजासाठी न्याय मिळवून देणारा आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी तातडीने झाली पाहिजे. यासाठी आम्ही सर्वजण एकत्र आलो असून हा लढा शेवटपर्यंत सुरू राहील." त्यांनी पुढे सांगितले की, उपवर्गीकरणामुळे समाजातील वंचित घटकांना न्याय मिळणार असून शिक्षण, नोकरी आणि सामाजिक संधींमध्ये समतोल साधला जाईल. त्यामुळे शासनाने कोणतीही दिरंगाई न करता निर्णयाची अंमलबजावणी करावी, अशी मागणीही करण्यात आली. दरम्यान, या चळवळीमुळे मातंग समाजात नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी काळात राज्यभर आंदोलनाची तीव्रता वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# दुरूस्तीचे पूर्वनियोजित कामे आता सकाळच्या सत्रात होणार


- सकाळी सात ते रात्री अकरा पर्यंत दुरुस्तीचे काम करण्याचे आदेश
- रात्री उकाड्यामुळे त्रस्त नागरिकांना दिलासा मिळणार

मुंबई (दै. आरंभ पर्व)

उन्हाळ्यात विजेच्या वाढत्या मागणीच्या कालावधीत आणि पावसाळी परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून वीज यंत्रणेशी संबंधित विविध देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सध्या वेगात सुरु आहे. मात्र उन्हाचा तडाख्यात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे संबंधित दिवशी सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करावेत असे निर्देश मुख्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना शनिवारी (दि. २५) देण्यात आले. महावितरणची प्रामुख्याने पावसाळ्यात वीजयंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी तसेच वीजपुरवठा खंडित होणे व वीजसुरक्षेचे धोके टाळण्यासाठी वीज ग्राहकांना पूर्वसूचना देऊन देखभाल व दुरूस्तीचे कामे वीजराज्यभरात सध्या सुरु आहे. साधारणतः मे महिन्याच्या अखेरीस सर्व कामे पूर्णत्वास जातात. मात्र सद्यस्थितीत सकाळी १० ते दुपारी २ किंवा चार वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद ठेवत देखभाल व दुरुस्तीचे कामे सुरु आहेत.

# तळेगाव हत्याकांड प्रकरणात साक्षीदाराचा गंभीर आरोप

## साक्ष नोंदवण्याची मागणी



पुणे (दै. आरंभ पर्व)

तळेगाव दाभाडे येथील किशोर आवारे हत्याकांड प्रकरणात साक्षीदार मोहसिन हमीद मुलाणी यांनी केलेल्या धक्कादायक आरोपांमुळे प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी आपल्या साक्षीवर दबाव टाकण्यात आल्याचा दावा करत, आपली साक्ष अधिकृतपणे नोंदवून घ्यावी अशी मागणी केली आहे. मुलाणी यांनी सांगितले की, या प्रकरणातील महत्त्वाची माहिती त्यांनी पूर्वीच दिली असून, काही आरोपींनी हत्या करण्याचा कट रचल्याची माहिती त्यांना आधीपासून होती. मात्र, त्यांचा जबाब बदलण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकण्यात आला, तसेच धमक्याही देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पनवेल न्यायालयात सुनावणीदरम्यान काही व्यक्तींनी त्यांच्याशी संपर्क साधून, जबाबातील काही नावे काढून टाकण्याचा आग्रह धरला. तसे न केल्यास खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची व 'एन्काऊंटर' करण्याची धमकी देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, 3 जुलै 2024 रोजी तयार करण्यात आलेला जबाब हा बनावट असल्याचा दावा करत, "माझा खरा जबाब 1 जून 2023 रोजी दिलेला आहे. त्यानंतर कोणताही जबाब मी दिलेला नाही," असे त्यांनी सांगितले. पोलिसांनी बनावट पत्र दाखवून जबाब बदलण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप त्यांनी केला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, "माझी साक्ष निष्पक्षपणे व अधिकृतरित्या नोंदवून घ्यावी," अशी मागणी त्यांनी पत्रकार परिषदेमधून केली. तसेच, या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, अशीही त्यांनी मागणी केली आहे. दरम्यान, साक्षीदारांना धमक्या दिल्या जात असल्याचेही त्यांनी नमूद केले असून, काही साक्षीदारांकडून जबरदस्तीने कागदपत्रांवर सह्या घेतल्या जात असल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे या प्रकरणात साक्षीदारांच्या सुरक्षिततेचा मुद्दाही पुढे आला आहे. या गंभीर आरोपांमुळे तळेगाव हत्याकांड प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले असून, संबंधित यंत्रणांनी याची गांभीर्याने दखल घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# कोल्हेवाडी येथे नवीन पिण्याच्या पाण्याच्या लाईनचे उद्घाटन



खडकवासला (दै. आरंभ पर्व)

खडकवासला ते कोल्हेवाडी परिसरातील नागरिकांच्या दीर्घकालीन पाणीटंचाईच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी १२ इंची नवीन पिण्याच्या पाण्याच्या लाईनचे उद्घाटन नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले. हा उद्घाटन सोहळा खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते संपन्न झाला. कोल्हेवाडी परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. अनेक वेळा नागरिकांना दूरवरून पाणी आणावे लागत होते. या गंभीर समस्येची दखल घेत पुणे महापालिकेच्या नगरसेविका सौ. धनश्री कोल्हे यांनी पुढाकार घेत निधी उपलब्ध करून देत नवीन पाण्याच्या लाईनचे काम सुरू केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे आता या भागातील नागरिकांना नियमित आणि शुद्ध पाणीपुरवठा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. उद्घाटन प्रसंगी आमदार तापकीर यांनी बोलताना सांगितले की, "नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिक जबाबदारी आहे. पाणी हा जीवनाचा अत्यावश्यक घटक आहे आणि कोल्हेवाडीतील ही समस्या सोडवण्यासाठी केलेले हे काम निश्चितच लोकांसाठी दिलासा देणारे आहे." त्यांनी नगरसेविका धनश्री कोल्हे यांच्या कामाचेही कौतुक केले.

या कार्यक्रमाला नगरसेवक सुभाष भाऊ नाणेकर, नगरसेविका धनश्री कोल्हे, मंडलाध्यक्ष विजय मते, ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे, भाजपचे नेते गंगाधर भडावळे,किशोर पोकळे, सचिन दांगट, भाजपा ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेश गायकवाड, ,जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते, माजी जिल्हा नियोजन समिती सदस्य अशोक मते, किरण हगवणे, महेश हगवणे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले.

"आता आम्हाला पाण्यासाठी भटकंती करावी लागणार नाही," अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. या प्रकल्पामुळे कोल्हेवाडी परिसरातील शेकडो कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून भविष्यातील पाणीटंचाईवरही नियंत्रण मिळण्यास मदत होणार आहे. एकूणच, या नवीन पाण्याच्या लाईनमुळे कोल्हेवाडी परिसराच्या विकासाला नवी दिशा मिळाली असून नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




# फायर सेफ्टी व सिक्युरिटी क्षेत्रातून राष्ट्रनिर्मितीला चालना

पुणे (दै. आरंभ पर्व)

"आपला भारत देश तंत्रज्ञान, उद्योग, सुरक्षा, अवकाश संशोधन स्वतंत्र ओळख निर्माण करीत असून, सक्षम अर्थव्यवस्था म्ह्णून जागतिक स्तरावर स्थान बळकट करीत आहे. भारताची प्रतिमा एक सक्षम, विश्वासार्ह आणि वेगाने प्रगती करणारा देश अशी तयार होत आहे. फायर सेफ्टी आणि सिक्युरिटी क्षेत्रातील कामगिरीही याला अपवाद नाही. त्यातून राष्ट्रनिर्मितीला चालना देण्याचे काम होत आहे," असे प्रतिपादन भारताचे माजी राजदूत व परराष्ट्र सेवेतील निवृत्त अधिकारी दीपक वोहरा यांनी केले. फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया (एफएसएआय) पुणे चॅप्टरच्या वतीने 'सुरक्षित भारत' या विषयावरील चर्चासत्रात दीपक वोहरा बोलत होते. वाकड येथील हॉटेल टिपटॉप इंटरनॅशनल येथे आयोजित या चर्चासत्र 'सुरक्षित भारत' घडवण्यासाठी तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर, नियमांचे काटेकोर पालन आणि सर्व स्तरांवर जागरूकता वाढवण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. तसेच यावेळी 'एफएसएआय'च्या डायरीचे प्रकाशन करण्यात आले. वोहरा व पोटफोडे यांच्या हस्ते १२ मान्यवरांचा उल्लेखनीय कार्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला.

## सहभागी महिलांच्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया

**एका स्पर्धकाने सांगितले की, कामाचा ताण आणि अडचणीत आपण हसणे विसरतो, पण या स्पर्धेमुळे ४ वर्षांपूर्वीचा एक नॅचरल फोटो शोधता आला आणि त्या एका फोटोने मला मैत्रीचा अनमोल खजिना मिळवून दिला. दांडिया आणि महिला दिनानंतरचा हा सलग तिसरा यशस्वी कार्यक्रम ठरल्याबद्दल महिलांनी नारायणी ग्रुपचे आभार मानले. "स्त्री ही घराची अन्नपूर्णा असते, पण आज तिने स्वतःसाठी आनंदाचा घास घेतला," अशी भावना सहभागी महिलांनी व्यक्त केली. पुणेकरांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर हसू आणणारा हा 'स्माईली दिवस' खऱ्या अर्थाने 'सुपरहिट' ठरला आहे.**

# 'श्री महालक्ष्मी इव्हेंटचा' अनोखा सोहळा संपन्न

## वयाची सत्तरी गाठलेल्या आजींच्या मनमोकळ्या हास्याने खुलला



पुणे (दै. आरंभ पर्व)

धावपळीच्या आयुष्यात स्वतःचे हसू हरवून बसलेल्या ७० वर्षांपारच्या आजी जेव्हा एखाद्या लहान मुलीसारख्या खळखळून हसतात, तेव्हा तो क्षण केवळ आनंदाचा नसून समाधानाचा ठरतो. असाच एक अविस्मरणीय अनुभव नुकताच 'श्री महालक्ष्मी इव्हेंट' आणि 'नारायणी ग्रुप' तर्फे आयोजित 'स्माईली कॉम्पिटिशन' आणि महिलांच्या स्नेहसंमेलनात (Get-together) पाहायला मिळाला. जयपुर थाळी येथे रंगलेल्या या सोहळ्याने ज्येष्ठ महिलांच्या आयुष्यात आनंदाचे नवे रंग भरले.

'खुलके स्माईल करो' या संकल्पनेवर आधारित ही स्पर्धा केवळ एका तासासाठी घेण्यात आली होती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, अवघ्या एका तासात ७० पेक्षा जास्त ज्येष्ठ महिलांनी आपले हसरे फोटो पाठवून या स्पर्धेत सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे, स्वतःचा खरा स्माईल असलेला फोटो शोधताना अनेक महिलांना त्यांच्या जुन्या आठवणीत रमावे लागले. "आपले मनमोकळे हसू नेमके कुठे आहे?" हे शोधतानाचा तो प्रवास प्रत्येक सहभागी महिलेसाठी खास ठरला. सुरुवातीला केवळ ७ विजेते निवडण्याचे ठरले होते, परंतु महिलांचा उदंड प्रतिसाद आणि त्यांच्या चेहऱ्यावरील उत्साह पाहून आयोजकांनी ९ विजेत्यांची निवड केली. या नऊ भाग्यवान महिलांना 'विशाल ज्वेलर्स' तर्फे चांदीची जोडवी देऊन सन्मानित करण्यात आले. प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावर जेवढ्या आनंदाचे हसू होते, तेवढ्याच अभिमानाने त्यांनी हा सन्मान स्वीकारला.

हा इव्हेंट केवळ स्पर्धा नसून ते एक भावनिक गेट-टुगेदर ठरले. आई-मुलीचे प्रेम आणि मैत्रिणींमधील अतूट नातं यानिमित्ताने अधिक घट्ट झाले. आयोजक सोनू जोशी यांच्या नियोजनामुळे अनेकांना या वयात नवीन मैत्रिणी मिळाल्या. उपस्थितांनी याबद्दल भावना व्यक्त करताना सांगितले की, "या इव्हेंटमुळे आम्हाला 'आई' या शब्दातील मायेची प्रचिती आली आणि खूप प्रौढ (Proud) फील झाले." जयपुर थाळी येथे आयोजित या स्नेहसंमेलनात केवळ स्पर्धाच नव्हती, तर चविष्ट जेवण, मजेशीर गेम्स, आणि पपेट शो (Puppet Show) अशा मनोरंजनाची मेजवानीही होती. रेड आणि ग्रीन थीममध्ये नटलेल्या महिलांमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. 'स्माईल ऑफ द डे' मुळे कार्यक्रमात एक वेगळीच रंगत आली.